**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.जगदीश अर्जुना सूर्यवंशी
मु.पो.व्हनाळी, ता.कागल, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५७/२०११/कोल्हापूर<br>१४५८/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.जगदीश अर्जुना सूर्यवंशी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलांसोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी

यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- ६ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, **अपीलकर्ता**
डी वॉर्ड, घर नं.२६४६,
पाठीमागची बाजू, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा,**
छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय,
कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,**
छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५६/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.शिवाजी आनंदा कापसे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ६ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मधुकर दत्तात्रय शिराळे
ई वॉर्ड, नेहरु चौक, हुपरी, **अपीलकर्ता**
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक,** **उत्तरवादी**
भूमि अभिलेख, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४३/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.मधुकर दत्तात्रय शिराळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- ६ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.वैशाली अप्पासाहेब यशवंत
६,मंगलमुर्ती बंगला, मंगलमुर्ती कॉलनी, **अपीलकर्ता**
दक्षिण शिवाजी नगर, सांगली-४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (नगररचना),**
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८९/२०११/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्त्या सौ.वैशाली अप्पासाहेब यशवंत यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ६ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.चंद्रकांत मोहनराव मगर
द्वारा ॲड.जयराज रामचंद्र विजापुरे **अपीलकर्ता**
ॲड मंगला लक्ष्मण
ॲड अभिजीत दवे
ए-११, महिन्म सोसायटी, भाग्यश्री बिल्डिंग,
कर्वेनगर, पुणे-४११ ०५२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
परिमंडळ-१ पुणे शहर, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
वारजे पोलीस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७८/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सर्व्हे नं.१५ हिस्सा नं.१-२, मेहे चेंबर्स, फ्लॅट नं.४, वारजे पुणे या मिळकती संदर्भात श्री.राजू शिवाजी भोसले यानी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.चंद्रकांत मोहनराव मगर द्वारा ॲड.जयराज रामचंद्र विजापुरे, ॲड.मंगला लक्ष्मण शिंदे व ॲड.अभिजीत दवे यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये तर्फे अर्ज /अपील करता येणार नाही

नागरिकांनी स्वतः अपील किंवा अर्ज करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.राजेश रामभाऊ खराडे
मु.पो.रामलिंग रोड, **अपीलकर्ता**
संत कैकाडी महाराज सांस्कृतिक भवन समोर,
घोडनदी (शिरुर), ता.शिरुर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय शिरुर,
ता.शिरुर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय शिरुर,
ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७९/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.राजेश रामभाऊ खराडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दिपक भानुदास गडकर
मु.पो.निमोणे, ता.शिरुर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**
**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय शिरुर,
ता.शिरुर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**१.जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
जाती वैद्यता प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.३,
पी.एम.टी.बिल्डिंग, कामगार न्यायालयाच्यावर,
स्वारगेट, पुणे-४११ ०३७

**२.जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय शिरुर,
ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९३/२०११/पुणे<br>१४९४/२०११/पुणे |
| २ | अपिलांसोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.दिपक भानुदास गडकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलांसोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेले नसल्याने या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.शंकर जडाप्पा शेलार
५३/२९०, पी.एम.सी.कॉलनी, **अपीलकर्ता**
जनवाडी, पुणे-४११ ०१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे शहर (२),
साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७५/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** येरवडा येथील गाडीवडार हौसिंग सोसायटीच्या नोंदणीसंदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.शंकर जडाप्पा शेलार यानी यापूर्वी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांचे अपील क्र.७६५/२०११/पुणे हे दाखलस्तरावर फेटाळण्यात आले होते. अपीलकर्ता श्री.शेलार यानी आयोगाकडे सादर केलेल्या फेर अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले

नाही, तसेच त्यानी एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कृष्णात रामचंद्र शेळके (पाटील)
मु.शेळकेवाडी, पो.सोनगांव, **अपीलकर्ता**
ता. व जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),**
पंचायत समिती सातारा,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत शेळकेवाडी,
ता. व जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५४/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत शेळकेवाडीच्या ऑगस्ट ते नोव्हेंबर, २०१० या कालावधीतील ग्रामसभेसंदर्भातील माहिती व श्री.विनोद गुरव, ग्रामपंचायत सदस्य यांच्या राजीनाम्याबद्दलची माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.कृष्णात रामचंद्र शेळके (पाटील) यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सचिन रामचंद्र गेजगे
मु.पो.वडणे, ता.फलटण, **अपीलकर्ता**
जि.सातारा

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,** **उत्तरवादी**
फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५५/२०११/सातारा |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.सचिन रामचंद्र गेजगे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- ३० जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मजीद बुडणभाई मुजावर
मु.पो.मेढा, ता.जावली, **अपीलकर्ता**
जि.सातारा-४१५ ५१२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय जावली,
मेंढा, ता.जावली, जि.सातारा-४१५ ५१२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय जावली,
मेंढा, ता.जावली, जि.सातारा-४१५ ५१२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६१/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मेंढा येथील पिर जलालदेव दर्गा ट्रस्टच्या मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यासंदर्भातील एकूण १० मुद्दयांची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.मजीद बुडणभाई मुजावर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे व अपीलकर्त्याने नमूद केलेली अपिलाची कारणे विचारात घेता अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) मध्ये विहित केलेली प्रथम

अपिलाबाबतची कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे. अपीलकर्ता श्री.मुजावर यानी प्रथम अपील केले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रताप बाबुराव कोंडेदेशमुख
मु.पो.खेड शिवापुर, ता.हवेली, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा महसूल,**
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय आयुक्त यांचे चिटणीस**
विभागीय आयुक्त कार्यालय,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४३/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** खेड शिवापूर, ता.हवेली जि.पुणे येथील गट क्र.६५ व गट क्र.८० या इनाम जमिनींच्या संदर्भातील खुलासेवजा माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.प्रताप बाबुराव कोंडेदेशमुख यानी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सतबीर सिंग दिलिप सिंग **अपीलकर्ता**
मु.पो.थुराना, ता.हन्सी,
जि.हिसार (हरियाणा)

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,**
क्रिडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,**
क्रिडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४६/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** संचालक, क्रिडा व युवक कल्याण यानी दिलेल्या शाररिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रमाणपत्राबाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.सतबीर सिंग यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

मे.नयना जनरल स्टोअर्स
१८१ अ, रविवार पेठ,
सातारा-४१५ ००१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा संचालक,**
महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक भांडार व वितरण केंद्र,
सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा भांडार व्यवस्थापक,**
महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक भांडार व वितरण केंद्र,
सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६२/२०११/सातारा |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विक्री सहाय्यक भांडार अधीक्षक कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची नावे, दर्जा, वेतन श्रेणी व दैनंदिन कार्यपध्दतीसंदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे व्यक्तीच्या नावे असणे आवश्यक आहे संस्थेच्या नाही. सबब

मे.नयना जनरल स्टोअर्स, सातारा यानी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.उत्तम एच.भंडारे
मिनाक्षी चित्रमंदिरा समोर, **अपीलकर्ता**
पलुस, ता.पलुस, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५१/२०१०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.उत्तम एच. भंडारे यांच्या सेवाविषयक बाबी संदर्भात | |

**<u>विवेचन</u>**

'थकित असणारा २० दिवसांचा पगार देण्याचे लेखी दिले असल्यामुळे माझी काही एक तक्रार राहिलेली नाही. अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.उत्तम एच.भंडारे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यानी दि.२७.६.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले. अपीलकर्ता याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली श्री.पी.जी.साठे याची प्रशासकीय कार्यवाही करण्याची कृती उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ७ जुलै २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.तानाजी मारुती कुरडे
वाघापूर, ता.भुदरगड, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था (दुग्ध), ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६ ००३

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
श्री शेतकरी सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित,
वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३४/२०११/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री शेतकरी सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्यादित, वाघापूर, ता.भुदरगड, जि.कोल्हापूर या संस्थेच्या संदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.तानाजी मारुती कुरडे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.भिमराव लक्ष्मण कोळी
मु.पो.कारंदवाडी, ता.वाळवा, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
ग्रामपंचायत विभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७६/२०११/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.भिमराव लक्ष्मण कोळी यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.परशुराम एम.दिवानंद
३०२, दिवाणजी सहकारी हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
तिसरा मजला, ए-विंग, गोकुल नगर,
कोंढवा बुद्रुक, पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९५/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आयोगाकडील अपील क्र.१५५४/२०१०/पुणे निकाली काढलेसंदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.परशुराम एम.दिवानंद यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती

आयोग, पुणे खंडपीठ, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.महादेव गणपती कांबळे
९७२ पार्वती निवासच्या मागे, **अपीलकर्ता**
सांगली वेस, चांभार गल्ली,
मिरज, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार,**
मिरज विभाग, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७३/२०११/सांगली |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.महादेव गणपती कांबळे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.नारायण दत्तात्रय थोपटे
सर्व्हे नं.१७, धनकवडी आंबेगांव, **अपीलकर्ता**
कात्रज, पुणे-४११ ०४६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११ ००७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१३/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नारायण दत्तात्रय थोपटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्ता श्री.थोपटे यांच्या अशाच आशयाच्या अपील

क्र.१८७७/२००९/पुणे, २११५/२०१०/पुणे या अपिलांवर यापूर्वी आयोगाने आदेश पारित केलेले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

सौ.रेखाताई नारायण थोपटे
सर्व्हे नं.१७, धनकवडे पाटील नगर, **अपीलकर्ता**
कात्रज, पुणे-४११ ०४६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११ ००७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड,
पुणे-४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१२/२०११/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्त्या सौ.रेखाताई नारायण थोपटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य

आहे. अपीलकर्त्या सौ.थोपटे यांच्या अशाच आशयाच्या अपील क्र.२१२३/२०१०/पुणे, १८७६/२००९/पुणे या अपिलांवर यापूर्वी आयोगाने आदेश पारित केलेले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अ.ज.इनामदार
श्री दिव्यदर्शन अपार्टमेंट, वीसे मळा, इच्छामण गणपती मंदिराशेजारी,
कॉलेजरोड, जि.नाशिक — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, विशेष पोलीस
महानिरीक्षक कार्यालय, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६८ ते १७७३ / २०११ / पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी नसलेल्या विक्रेत्यांकडून वाहनांच्या सुट्या भागांची खरेदी, वाहन दुरूस्ती यात मोटार परिवहन विभागात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात आला असून त्याबाबत विविध अर्जांद्वारे मागितलेली माहिती दिली जात नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या प्रकरणाची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चालू असून भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक माहिती दिली जात नाही. उलट माहितीचा पाठपुरावा केल्यामुळे पोलीस अधीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अतुल पाटील यानी धमकी दिली व मारहाण केली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.एस.एस.इनामदार यानी राज्य माहिती आयोगाकडील उपरोक्त अपील अर्जांमध्ये केली आहे.

श्री.इनामदार हे मोटार परिवहन विभागात पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते. वाहनांच्या सुट्या भागांची खरेदी, वाहन दुरूस्ती आदीमध्ये भ्रष्टाचार केल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू आहे. ती अद्याप पूर्ण झालेली नाही. या प्रकरणी दबाव आणण्यासाठी विविध पातळ्यांवर तक्रारीचे, आरोप करणारे अर्ज व पत्रव्यवहार, तसेच माहितीच्या अधिकारात अर्ज व अपिले ते सातत्याने करीत असतात. नागपूर, औरंगाबाद, ठाणे व पुणे अशा विविध कार्यालयांकडील सन १९९६ पासूनची माहिती विविध अर्जांद्वारे त्यानी मागितली असून ५८ अर्ज व ३० अपिले केली आहेत. वेळोवेळी त्याना उत्तरे दिली आहेत. समक्ष येऊन अभिलेखाची पाहणी करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घ्याव्यात, भ्रष्टाचार प्रकरणाची चौकशीची कार्यवाही चालू असलेल्या संदर्भातील माहिती चौकशीपूर्ण होईपर्यंत देता येणार नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (प्रशासन), विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.एच.एस.पडवळ यानी श्री.इनामदार यांच्या आयोगाकडील अपील क्र.१९८५ + ३१२६ ते ३१३१ / पुणे या अपिलांच्या सुनावणीच्या वेळी नमूद केले होते.

श्री.इनामदार यानी नव्याने दाखल केलेली अपील क्र.१७६८ ते १७७३/२०११/पुणे ही अपिले याच विषयाबाबतची असून एकाच विषयातील माहितीसाठी पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती खर्ची न घालण्याची समज त्याना देण्यात येत आहे. चौकशीच्या अपूर्ण कार्यवाहीतील कागदपत्रे वगळता सर्व अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतील. संबंधित विषयातील संबंधित कार्यालयांमधील (विभागीय चौकशीच्या कार्यवाहीतील कागदपत्रे वगळता) सर्व संचिका अवलोकनासाठी अपीलकर्त्यास उपलब्ध करून देणे व ते ज्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी करतील त्या कागदपत्रांच्या प्रती देणे ही कार्यवाही अपिलीय प्राधिकारी यानी केली पाहिजे. मात्र खुलासा, स्पष्टीकरण, कायदेविषयक अन्वयार्थ, अशी विचारणा/मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत करता येणार नाही. प्रशासकीय कार्यवाहीविषयीच्या अपीलकर्त्याच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. तसेच पोलीस अधीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अतुल पाटील यानी धमकी देऊन मारहाण केली असल्यास पोलिसांकडे / न्यायालयात तक्रार गुदरण्याचा रीतसर मार्ग त्याना उपलब्ध आहे.

याच विषयातील अपीलकर्त्याच्या यापुढील अर्ज व अपिलांबाबत हीच कार्यपध्दती अवलंबिणे आवश्यक असून याच विशयाबाबत अपीलकर्त्यानी आयोगाकडे चौकशी व कार्यवाही करणे ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील बाब नाही. अपिले केल्यास त्यांची दखल घेण्यात येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. अभिलेख अवलोकनाबाबतची पूर्तता न केल्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी अपीलकर्ता श्री.इनामदार याना हव्या असलेल्या सर्व अभिलेखांचे अवलोकन करू देण्याची व त्यानी लेखी मागणी केल्यास त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती देण्याची व्यवस्था करावी. त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांकडून याबाबतची कार्यवाही होईल, ही त्यांची जबाबदारी आहे. याबाबत पूर्तता न झाल्यास जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी कारवाईस पात्र ठरतील. मात्र चौकशीची कार्यवाही सुरू असलेल्या प्रकरणातील कागदपत्रे अवलोकनासाठी अथवा प्रतींच्या स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार नाहीत.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २९ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बालाजी प्रभाकर विठ्ठलकर
गाळा नं.८, जिल्हा परिषद मेन गेट समोर,
सिध्देश्वर पेठ, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
संत दामाजी हायस्कूल मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६११/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बालाजी प्रभाकर विठ्ठलकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय

इ. आवश्यक कागदपत्रे, तसेच योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मुरारी तुकाराम पाटील
मु.पो.कोलोली, ता.पन्हाळा, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,** **उत्तरवादी**
ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग क्र.२,
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२८/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.मुरारी तुकाराम पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच उपलब्ध कागदपत्रांवरुन त्यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संजय दिनकर गाडेकर
शाहुनगर, नवीन कमानीजवळ, **अपीलकर्ता**
कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
कागल नगरपरिषद, ता.कागल,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
कागल नगरपरिषद, शिक्षण मंडळ, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२३/२०११/कोल्हापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.संजय दिनकर गाडेकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच

अपिलावर अपीलकर्त्याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.संजय अशोक घोडके
श्री महालक्ष्मी निवास, **अपीलकर्ता**
मार्केट यार्ड शेजारी,
पंढरपूर, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९१/२०११/सोलापूर<br>१५९२/२०११/सोलापूर |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.संजय अशोक घोडके यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी

यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.धनंजय नामदेव मोटे
मु.कंठी, ता.जत, **अपीलकर्ता**
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती जत,
ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७५/२०११/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** भ्रष्ट अधिकाऱ्याविरोधात दि.२.२.२०११ रोजी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.धनंजय नामदेव मोटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रावरुन त्यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश शंकरप्पा हिंडोळे
बसवेश्वर, मार्केट यार्ड, **अपीलकर्ता**
अक्कलकोट-४१३ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ,**
सोलापूर शहर, पोलीस आयुक्तालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
सोलापूर शहर, पोलीस आयुक्तालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८१/२०११/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.सुनिल शहा यांच्याविरुध्द दिलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.सुरेश शंकरप्पा हिंडोळे यानी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील

करणे आवश्यक आहे. तसेच अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.जवाहरलाल आण्णासाहेब रोटे
६४४ ई, पहिली गल्ली, शाहुपुरी, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत).**
पंचायत समिती करवीर,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत जैत्याळ,
ता.करवीर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२०/२०११/कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** देयक त्वरित मिळणेबाबत. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.जवाहरलाल आण्णासाहेब रोटे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता ग्रामपंचायतीने खरेदी केलेल्या साहित्याचे

बिल सत्वर देण्याची मागणी त्यानी केली आहे. ती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय कृष्णा कुंभार
ए-६, अनुपमा को-ऑप.हौसिंग सोसायटी, बॉडीगेट, औंध, पुणे-७ तक्रारकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, क्रिडा व युवक संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्र.सहाय्यक संचालक, क्रिडा व युवक संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | तक्रार क्रमांक | ८३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.११.२०१० |

**३. उपस्थित**

**तक्रारकर्ता** श्री.विजय कृष्णा कुंभार
ए-६, अनुपमा को-ऑप.हौसिंग सोसायटी, बॉडीगेट, औंध, पुणे-७

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी, पुणे प्रतिनिधी श्री.एम.एन.ठोसरे

**जन माहिती अधिकारी** तथा प्र.सहाय्यक संचालक, क्रिडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र

| | |
|---|---|
| | राज्य, छत्रपती क्रिडा संकुल, बालेवाडी, पुणे श्री.उदय जोशी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेतील खर्च, निविदा आदिंची माहिती तक्रारकर्ता श्री.विजय कुंभार यानी मागितली होती. ती न मिळाल्याची तक्रार त्यानी केल्यामुळे आयोगाने संचालनालयाकडून दि.२१.८.२०१० च्या पत्रान्वये खुलासा मागविला. श्री.कुंभार याना माहिती देण्यात आली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये संचालनालयाच्या संकेतस्थळावर आवश्यक माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे. स्पर्धेच्या संबंधातील सर्व संचिका श्री.कुंभार याना अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या, असा खुलासा प्र.सहाय्यक संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी दि.३१.८.२०१० रोजी केला. परंतु या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे माहिती मिळालेली नसल्याची तक्रार श्री.कुंभार यानी आयोगाकडे केली. त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी यानी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>तक्रारकर्ता</u> : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ प्रमाणे स्पर्धेच्या खर्चाबाबतचा निविदांसह सर्व तपशील, तिकिट विक्री, वस्तूंची खरेदी, लाभार्थींची यादी, पुरस्कार विजेत्यांची यादी आदि तपशील संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहीर केला जाणे आवश्यक आहे. परंतु असा तपशील दिलेला नाही. हिशेबाच्या नावाखाली जुजबी तपशील दिला आहे. त्याच्या सत्यतेबद्दल पुराव्याची कागदपत्रे त्यात नाहीत. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ही सर्व माहिती नागरिकांना उपलब्ध होणे आवश्यक आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> : श्री.कुंभार याना सर्व संचिका अवलोकनासाठी उपलबध करून दिल्या होत्या. परंतु त्यानी संपूर्ण माहितीचे अवलोकन केले नाही. राज्य शासनाचा या स्पर्धेतील भाग व आयोजन समितीचा भाग हे दोन भिन्न विभाग असून राज्य शासनाकडील खर्च व अन्य तपशील देता येईल. तसेच हा तपशील संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. राज्य शासनाकडून रूपये ४२५.५० कोटी निधी उपलब्ध झाला त्याच्या विनियोगाचा तपशील त्यात आहे. आयोजन समितीकडून झालेल्या रूपये ४५० कोटीच्या विनियोगाचा हिशोब ही स्वतंत्र बाब असून त्या समितीकडूनच हा तपशील घ्यावा

लागेल. तसेच महालेखापलांच्या लेखा परीक्षण पथकामार्फत या स्पर्धेच्या खर्चाचे लेखापरीक्षण चालू असून अद्याप पूर्ण व्हावयाचे आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तिसऱ्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या निधीच्या विनियोगापासून सर्व तपशील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार नागरिकांसाठी संकेतस्थळावर / कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक असूनही पूर्णांशाने त्याची पूर्तता झालेली नाही. राज्य शासन व आयोजन समिती असे दोन स्वतंत्र विभाग असले तरी नागरिकांना एकत्रितरीत्या स्पर्धेचा संपूर्ण तपशील उपलब्ध झाला पाहिजे. तसेच महालेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण पूर्ण होताच त्याचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रे व पत्रव्यवहार यासह सर्व माहिती संकेतस्थळावर/कार्यालयात नागरिकांसाठी जाहीर केली गेली पाहिजे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता व शासकीय यंत्रणेचे उत्तरदायित्त्व या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील मूलभूत तत्त्वांनुसार ते अत्यावश्यक व बंधनकारक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

तक्रार मान्य करण्यात येत आहे. तिसऱ्या राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेच्या लेखापरीक्षण अहवालासह निविदा प्रक्रिया, लाभार्थी पुरस्कार आदि सर्व तपशील अनुषंगिक कागदपत्रांसह क्रीडा व युवक संचालनालयाने संकेतस्थळावर जाहीर करावा. तसेच अवलोकनासाठी / नागरिकांनी मागणी केल्यास कागदपत्रांच्या छायाप्रतींच्या स्वरूपात उपलब्ध करून द्यावा. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल दि.२५.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण
संपादक झेप यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर, इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यालय, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यालय, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण
संपादक झेप यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर, इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यालय, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
कार्यालय, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - अकलूज येथील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अधिनस्त कार्यालयांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी अद्याप दिली नाही. माहिती देण्याऐवजी त्यानी अन्य काही अपेक्षा आहे का, याची विचारणा केली व अशीच पध्दती अवलंबिली जात असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची व ढोबळपणाने माहिती मागितलेली आहे. नेमकेपणाने माहिती मागण्याबाबत त्याना विहित मुदतीत कळविले. अन्य अपेक्षांबाबत विचारणा व कार्यपध्दतीविषयीचे त्यांचे निवेदन निराधार आहे. त्यांच्या स्वतःच्याच काही अपेक्षा असतात का, हे तपासण्याजोगे आहे.

माहितीऐवजी अन्य अपेक्षा व कार्यपध्दती याबाबतचे उभय बाजूंचे दावे गंभीर स्वरूपाचे आहेत. मात्र त्याबाबतची चौकशी हा स्वतंत्र विषय आहे. अपीलकर्त्यांनी सरसकट स्वरूपात व विस्तृत माहिती मागितली आहे. त्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर योग्य आहे. आवश्यक असल्यास अपीलकर्ता यानी अभिलेखांचे अवलोकन करून माहिती प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंगद नरसिंहराव भोसले
सर्व्हे नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (आस्थापना),
शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (आस्थापना),
शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अंगद नरसिंहराव भोसले
सर्व्हे नं.५३/५८, साईनाथनगर, वडगावशेरी, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (आस्थापना), शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (आस्थापना), शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या कार्यालयातील कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवापुस्तकांचे अवलोकन करून सत्यप्रती मागितल्या होत्या. त्या दिल्या नाहीत. त्या देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यानी शासनाकडे मार्गदर्शन मागितले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांना सेवापुस्तके अवलोकनासाठी उपलब्ध करून दिली. मात्र ती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे त्याच्या छायाप्रती दिल्या नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या रूजू अहवालाच्या प्रती व अन्य माहिती संकलित करून दिली.

अपिलीय प्राधिकारी : कर्मचारी व अधिकारी यांच्या सेवापुस्तकाच्या छायाप्रती सरसकट उपलब्ध करून देता येणार नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता सरसकटपणे कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अवलोकनासाठी उपलब्ध करून देणे योग्य नाही. तसेच त्याच्या प्रतीही न देण्याचा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. संबंधितांच्या रूजू अहवालाच्या प्रती त्यानी दिल्या आहेत. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी देऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जनार्दन जिजाबा मोटे
दापोडी, पो.बोरीपार्धी, ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण),
दौंड बांधकाम विभाग, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण),
दौंड बांधकाम विभाग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण),
दौंड बांधकाम विभाग, जि.पुणे
विद्यमान-श्री.जनाप्पा रामचंद्र विभुते, तत्कालीन-श्री.रविंद्र शिवनारायणसिंह परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण), दौंड बांधकाम विभाग,
जि.पुणे
विद्यमान-श्री.पंडित केरू त्रिभुवन, तत्कालीन-श्री.मकरंद कमलाकर चाफळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

माहिती विलंबाने व चुकीची मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.जनार्दन जिजाबा मोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.मोटे यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य त्या विभागाकडे माहितीसाठी वर्ग करण्यात आला. त्या विभागाने विहित मुदतीत उत्तर दिले. अपीलकर्त्यांची मागणी नेमकी व स्पष्ट नसल्यामुळे तसेही कळविले. तारीखनिहाय कार्यवाहीचा आढावा प्रथम अपिलाच्या सुनावणीत घेण्यात आला असून दिलेली माहिती मुदतीत व योग्य असल्याचा स्पष्ट निष्कर्ष नोंदविला आहे, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण), दौंड बांधकाम विभाग, जि.पुणे अनुक्रमे श्री.पंडित केरू त्रिभुवन, श्री.मकरंद कमलाकर चाफळकर व विद्यमान व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे जिल्हा परिषद(दक्षिण), दौंड बांधकाम विभाग, जि.पुणे अनुक्रमे श्री.जनाप्पा रामचंद्र विभुते व श्री.रविंद्र शिवनारायणसिंह परदेशी यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
पुणे जिल्हा, परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
पुणे जिल्हा, परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु.पो.केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
पुणे जिल्हा, परिषद, पुणे श्री.दत्तात्रय पांडुरंग शेंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
पुणे जिल्हा, परिषद, पुणे श्री.पोपट दगडू भंडारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : प्राथमिक शिक्षण / शिक्षण सेवक भरतीच्या संदर्भात चौकशीची मागणी केली होती. त्या संदर्भातील माहिती मागणाऱ्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतु ती दिली गेली नाही. याच संदर्भातील माझी दोन अपिले आयोगाने निकाली काढली आहेत. माहिती दिल्याचे सांगून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी दिशाभूल करीत आहेत, त्याबाबत चौकशी व्हावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता सातत्याने एकाच स्वरूपाची विचारणा करीत असून सन १९९७ पासूनची माहिती मागत आहेत. मूळ विषयाच्या प्रकरणात उच्च न्यायालयात अपील केले होते. त्याची प्रत दिली. तसेच जुनी माहिती शोधून देण्यास वेळ लागणार असल्याची कल्पना अपीलकर्त्यास दिली होती. माहिती मिळाल्याचे व तक्रार नसल्याचे ते लेखी देतात व नंतर संबंधित पत्र बनावट असल्याची अथवा योग्य माहिती न मिळाल्याची तक्रार करतात.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी माहिती मिळाल्याचे त्या त्या वेळी लेखी दिल्याचे दिसते. संबंधित कागदपत्रे बनावट असल्याची त्यांची तक्रार असल्यास त्यानी त्याबाबत पोलिसांकडे फिर्याद नोंदविणे अधिक योग्य ठरेल. अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल बाळासाहेब भांडवलकर
मु.पो.कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, शिरूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोरेगाव भिमा,
ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल बाळासाहेब भांडवलकर
मु.पो.कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, शिरूर, जि.पुणे श्री.विजयकुमार महादू यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोरेगाव भिमा,
ता.शिरूर, जि.पुणे श्री.संजय हरिभाऊ खेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आपण मागितलेली माहिती मिळाली असून कोणत्याही प्रकारे तक्रार नाही, असे अपीलकर्ता श्री.सुनिल बाळासाहेब भांडवलकर यानी दि.२७.७.२००९ रोजी लेखी दिले असल्याचे अपीलकर्त्याच्या निवेदनाच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोरेगाव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे श्री.संजय हरिभाऊ खेडकर यानी नमूद केले. अशा स्वरूपाचे लेखी निवेदन देऊन नंतर पुन्हा अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सुवर्णा ज्ञानू कांबळे
रा. खातेनगर, रस्ता क्र. ४ मिरज, अपीलकर्ता
ता. मिरज, जि. सांगली ४१६ ४१०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५६/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. सुवर्णा ज्ञानू कांबळे
रा. खातेनगर, रस्ता क्र. ४ मिरज, ता. मिरज, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज, जि. सांगली श्री. डी. एस. शिपुरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- संजय गांधी, इंदिरा गांधी व वृध्दापकाळ योजनेतून निवृत्ती वेतन मिळणाऱ्या लाभार्थ्यांबाबतची मिरज शहरातील जानेवारी २००८ ते फेब्रुवारी २०१० या काळातील माहिती मागितली होती. विशिष्ट तक्त्यांमध्ये संकलित करुन ही माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यानी दिली नाही. काही लाभार्थ्यांचे पैसे त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेले नसल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती सरसकटपणे मागितली आहे. तसेच अनेक मुद्दयांमध्ये भाष्य करुन गृहितावर आधारित विचारणा केली आहे. सुमारे २००० लाभार्थ्यांची माहिती त्यानी दिलेल्या तक्त्यांमध्ये संकलित करुन देणे शक्य नाही. सर्व कागदपत्रे त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देता येतील.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेले अनेक मुद्दे तक्रारीच्या व आक्षेपाच्या स्वरुपाचे असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तसेच विशिष्ट नमुन्यामध्ये माहिती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तथापि या योजनांमधील लाभार्थ्यांसाठी असलेली जी रक्कम शासनाला परत करण्यात आली तिची १०० पृष्ठांपर्यंतची माहिती/ कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास ३ दिवसांत नि:शुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर भास्कर घोलप
मु.महागांव, ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.व्ही.टी.जमादार

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी,
तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.टी.जमादार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका स्वस्त धान्य दुकानदाराकडील सन २००५ ते २०१० या कालावधीतील धान्य वितरणासह विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्ता श्री.सुधाकर भास्कर घोलप यानी दि.२२.६.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. दुकानदारांकडून संबंधित नोंदीच्या वह्या मागवून माहिती संकलित करून दि.३१.७.२०१० रोजी दिली. जानेवारी २००५ ते ऑक्टोबर २००६ या कालावधीतील संबंधित रजिस्टर्स त्यावेळी उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यातील माहिती देता आली नव्हती. ती तयार असून देण्यात येत आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी, तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.टी.जमादार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसीलदार कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.टी.जमादार यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शाहीद रझा बुर्नी
डी/३, अमर क्लासिक, हडपसर, पुणे-४११०२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
डॉ.रेणू भारद्वाज

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
श्री.तानाजी मा.लकडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शाहीद रझा बुर्नी यानी दि.१६.६.२००९ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीबाबत दि.२९.६.२००९ च्या पत्राद्वारे कळविलेले शुल्क रूपये ८०००/- त्यानी भरले नाही. त्यामुळे माहिती दिली नाही. अभिलेख अवलोकनासाठी बोलाविले होते. त्यानुसार त्यानी अभिलेखाचे अवलोकन केले. शुल्क न भरता माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.तानाजी मा.लकडे यानी केले.

आपल्याला अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नसून गेल्या दोन वर्षात परिस्थितीत बराच बदल झाला असल्यामुळे आयोगाकडील अपिलाचा पाठपुरावा करण्यात आपल्याला स्वारस्य नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता यानी दि.५.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला पाठविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोकराव बबनराव रगडे
मु.पो.मळवली, ता.मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.संभू रंगनाथ गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

‘जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती, वडगाव मावळ, जि.पुणे व अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, जि.पुणे यांच्याकडे मी जी माहिती मागितली होती ती मला शिक्षणाधिकारी श्री.संभू रंगनाथ गायकवाड यानी दिली असल्याने मी केलेले अपील मागे घेत असून सदर माझे अपिलाबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही. माझे केलेले अपील निकाली काढावे,’अशा विनंतीचे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.अशोकराव बबनराव रगडे यानी दि.२९.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.संभू रंगनाथ गायकवाड यानीही या निवेदनाच्या प्रतीसोबत तशाच आशयाचे लेखी निवेदन दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १३ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर भागवत गात
मु. पो. जामगांव (आ), लातूर रोड, ता. बार्शी — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनियर कॉलेज, धोत्रे, मु. धोत्रे,
पो. खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शंकर भागवत गात
मु. पो. जामगांव (आ), लातूर रोड, ता. बार्शी

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी. आंबेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्रीराम विद्यालय व ज्युनियर कॉलेज, धोत्रे, मु. धोत्रे,
पो. खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. सुनिल दादाराव जाधवर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता -श्रीराम विद्यालय व ज्युनियर कॉलेज, धोत्रे, मु. धोत्रे, पो. खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर या संस्थेकडून कोणतीही माहिती दिली जात नाही. कागदपत्रांची चोरी झाल्याचे सांगितले जाते. परंतु ती सन २००५ पर्यंतची कागदपत्रे होती. मागितलेली माहिती नंतरच्या काळातील असूनही दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्ता संस्थेत शिपाई म्हणून नोकरीला होते. शाळेचे दस्तऐवज गहाळ होण्यात ते व त्यांचे साथीदार श्री. एम. व्ही. रोळेकर यांचा हात असल्याची तक्रार संस्थेने दाखल केलेली आहे. केवळ संस्थेवर दबाव आणण्यासाठी ते वारंवार त्याच त्याच विषयांची माहिती मागत असतात. आयोगाने यापूर्वी त्यांची अपील क्र. २०४५/२००९/सोलापूर व अपील क्र. २१८९/२०१०/सोलापूर ही अपिले निकाली काढली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता एकाच शाळेकडील कागदपत्रांची/माहितीची मागणी सातत्याने करीत असून त्यामागे सार्वजनिक हिताचा कोणताही संदर्भ दिसत नाही. संस्था व अपीलकर्ता यांच्यातील वादासाठी माहितीच्या अधिकाराचा अयोग्य प्रकारे वापर करुन सर्व यंत्रणांचा वेळ व परिश्रम यांचा अपव्यय न करण्याची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय व ज्युनियर कॉलेज, धोत्रे, पो. खामगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. सुनिल दादाराव जाधवर यानी करु द्यावे. असे अवलोकन करुन लेखी मागणीनुसार हव्या त्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता प्राप्त करुन घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भिमराव गणपती थोरवे
मु. गिरीजा शंकरवाडी, पो. राजाचे कुर्ले,
ता. खटाव, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय वडूज, ता. खटाव, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय वडूज, ता. खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२७/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भिमराव गणपती थोरवे
मु. गिरीजा शंकरवाडी, पो. राजाचे कुर्ले, ता. खटाव, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय वडूज, ता. खटाव, जि. सातारा श्री. बी. एस. मोहिते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- शेतजमिनीच्या संदर्भातील सन १९८५ ते १९९५ या काळातील नोंदींबाबतची पूरक कागदपत्रांच्या प्रतींसह माहिती मागितली होती. ती १३ महिन्यानंतर व अर्धवट मिळाली. पूर्ण माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. ३.६.२०१० च्या अर्जाला दि. ८.७.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. विशिष्ट नोंदींबाबतचे खुलासे, स्पष्टीकरण, कायदेशीर अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा त्यानी बहुसंख्य मुद्दयांमध्ये केली आहे. जुन्या कागदपत्रांचा शोध घेऊन उत्तर देण्यास ४ दिवस विलंब झाला. संबंधित कागदपत्रे आढळत नसल्यामुळे अधिक तपशील देता आला नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी माहितीपेक्षा स्पष्टीकरण, पुरावे अशा स्वरुपाची मागणी बहुसंख्य मुद्दयांमध्ये केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करु देऊन त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यानी द्याव्यात. तसेच तत्कालीन कर्मचा-यांना विचारणा करुन मूळ प्रकरणाचा १५ दिवसांत शोध घेऊन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कार्यवाही करुनही मूळ प्रकरण उपलब्ध न झाल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय वडूज, ता. खटाव, जि. सातारा श्री. बी. एस. मोहिते व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय वडूज, ता. खटाव, जि. सातारा श्री. एस.एन. शेरखाने यानी १/४.६.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. विलास रामचंद्र पुरवत
मु. पो. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
न्यू इंग्लिश स्कूल, करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८४२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** डॉ. विलास रामचंद्र पुरवत<br>मु. पो. करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,<br>न्यू इंग्लिश स्कूल, करकंब, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. भारत शंकर खंडागळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - प्रभारी मुख्याध्यापकांसह काही शिक्षकांच्या मान्यतेबाबतची माहिती मागितली होती. ती अपूर्ण दिली. तसेच आवश्यक ते पुरावे दिले नाहीत.

जन माहिती अधिकारी- माझ्यासह चार शिक्षकांचे मान्यतेचे प्रस्ताव संस्थेकडे असून संस्थेकडून मला ते मिळालेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रती देता आल्या नाहीत. अपीलकर्त्यांच्या पत्नी मुख्याध्यापिका असल्यामुळे संस्थेने त्यांच्या काळातील कागदपत्रे मला दिलेली नाहीत. माझ्याकडील माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यानी दिलेल्या माहितीच्या प्रतींसह पूरक कागदपत्रे सादर केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता मुख्याध्यापकांसह अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या ४ शिक्षकांच्या मान्यता पत्राच्या प्रती/मान्यता दिली नसल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर यानी त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखातून अथवा संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. ३०.६.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा .

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड. मोतीलाल हजारीलाल आगरवाल
ऑफिस नं. ६, पूर्व विभाग, श्री. दत्त मंदिर देवस्थान,
दत्तनगर, सोलापूर ४१३ ००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
बी.सी.यु.डी.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग,
केगांव, सोलापूर ४१३ २५५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग,
केगांव, सोलापूर ४१३ २५५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७२/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड. मोतीलाल हजारीलाल आगरवाल
ऑफिस नं. ६, पूर्व विभाग, श्री. दत्त मंदिर देवस्थान, दत्तनगर, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
बी.सी.यु.डी.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग,
केगांव, सोलापूर डॉ. आर. एन. शेंडगे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग,<br>केगांव, सोलापूर श्री. आर. बी. चिंचलकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - बी. कॉम. पदवी परीक्षेच्या संदर्भात जुना व नवा अभ्यासक्रम, तज्ज्ञांनी दिलेल्या नमुना उत्तरपत्रिकांची व प्रश्नपत्रिकांची त्यांच्या हस्ताक्षरातील प्रत, तसेच काही मुद्दयांचे स्पष्टीकरण अशी माहिती मागितली होती. परंतु ती मिळाली नाही. माहिती योग्य प्रकारे न देता शुल्क आकारणी केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांचा दि. २४.६.२०१० चा अर्ज परीक्षा विभाग व अभ्यास मंडळे विभाग यांच्याकडे माहितीसाठी त्याच दिवशी वर्ग करण्यात आला. वस्तुतः अभ्यासक्रमाच्या प्रतीसारखी सार्वजनिकरीत्या उपलबध असलेली माहिती अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागणे योग्य नव्हते. तरीही दि. १७.७.२०१० पर्यंत सर्व माहिती दिली. प्रश्नपत्रिका काढणाऱ्या व उत्तरपत्रिका तपासणाऱ्या परीक्षकांची नावे अपीलकर्त्यांनी मागितली असून ती देता येणार नाहीत. तसेच हस्ताक्षरातील प्रश्नपत्रिका व नमुना उत्तरपत्रिकांच्या प्रतीही संबंधितांची ओळख पटू नये म्हणून देता येणार नाही. स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची विचारणा व माहिती संकलित करुन देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार योग्य नसतानाही माहिती तयार करुन टंकलिखित ८० पृष्ठे सशुल्क दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर श्री. आर. बी. चिंचलकर

व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, बी.सी.यु.डी.सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर डॉ. आर. एन. शेंडगे यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची व सरसकट माहिती मागितली आहे. तसेच हस्ताक्षरातील नमुना उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिका या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (३) व ८ (जी) अन्वये विश्वासाश्रित संबंधात समाविष्ट होत असून न देण्याचा निर्णय योग्य आहे. तसेच माहिती संकलित करुन देणे बंधनकारक नसतानाही जन माहिती अधिकारी यानी ती दिली आहे. त्याबद्दल शुल्क आकारणी करणे रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत मा.देशपांडे
१६, विद्यालक्ष्मी हॅपी कॉलनी रस्ता क्र.१, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र.२,
ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र.२,
ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत मा.देशपांडे
१६, विद्यालक्ष्मी हॅपी कॉलनी रस्ता क्र.१, कोथरूड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.गणपत काशिनाथ साळुंके

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र.२, ढोले पाटील रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दिलीप काळू पावरा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : विकसकाने केलेले अनधिकृत बांधकाम काढण्याचे आदेश होऊनही कार्यवाही झालेली नाही. ती व्हावी.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : संबंधित प्रकरणात विकसकाने न्यायालयाचा स्थगिती आदेश घेतलेला आहे. न्यायालयीन निर्णयाशिवाय पुढील कार्यवाही करता येणार नाही.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलाब सिताराम जाधव
४७/३, भावेश सोसायटी, तावरे कॉलनी, पुणे सातारा रोड,
हॉटेल नवरत्न पाठीमागे, पुणे-९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खेड, तहसील कार्यालय,
खेड(राजगुरूनगर), ता.खेड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खेड, तहसील कार्यालय,
खेड(राजगुरूनगर), ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०५+२३०९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलाब सिताराम जाधव
४७/३, भावेश सोसायटी, तावरे कॉलनी, पुणे सातारा रोड,
हॉटेल नवरत्न पाठीमागे, पुणे-९

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खेड, तहसील कार्यालय,
खेड(राजगुरूनगर), ता.खेड, जि.पुणे श्रीमती रोहिणी आखाडे-फडतरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खेड, तहसील कार्यालय,
खेड(राजगुरूनगर), ता.खेड, जि.पुणे श्रीमती शीतल मुळे-भामरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पिकपहाणी सदरी अर्ज करूनही तलाठी वेळेत आले नाहीत. योग्य कार्यवाही केली नाही. संबंधित मिळकत पूर्वीपासून मालकी हक्काने आमच्या ताबेवहिवाटीला आहे, परंतु त्याबाबतची कागदपत्रे आमच्याकडे नाहीत. बेकायदेशीर खरेदीखतानुसार तलाठी व मंडल अधिकारी यानी वेगळे ७/१२ करून अन्य व्यक्तीचे नाव लावले. माझी वहिवाट असल्यामुळे माझे नाव लावावे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांच्या पिकपहाणीविषयक तक्रारीसंबंधी प्रकरण चालवून तहसीलदारांचे आदेश झालेले आहेत. मिळकतीला नाव लावण्याच्या संदर्भात असलेल्या तरतुदींची माहिती देणाऱ्या परिपत्रकांच्या प्रती दिलेल्या आहेत. अपीलकर्त्यांच्या मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांच्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. १४ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश विनायक पवार
२५१/क, शनिवार पेठ, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनिल पवार

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.विनायक वि.कोकरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : मराठा भांडीवाले सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारा श्री.प्रभाकर मारूती कोंढाळकर यानी संस्थेच्या विनोंदणी प्रस्तावाबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत.

<u>जन माहिती अधिकारी</u> : आमच्या कार्यालयाने मे २००० मध्ये दिलेल्या एका निर्णयाबाबतचा खुलासा अपीलकर्त्यानी मागितला होता. अशा स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याचे विहित मुदतीत कळविले. त्यानी मागितलेली कागदपत्रे सन १९९८ मधील असून ते अभिलेख पाच वर्षापेक्षा अधिक काळ जतन केले जात नाहीत. तसेच कार्यालयाचे स्थलांतर झाले आहे. त्यामुळे ती धारिका उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले.

संबंधित विषयातील धारिकेचा शोध घेऊन ती उपलबध झाल्यास, तसेच अपीलकर्त्याच्या मागणीच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावीत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत विश्वनाथ बोऱ्हाडे
कडोलकर कॉलनी, फ्लॅट नं.८४, रो-हाऊस बी-१,
तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.आनंद दा पुसावळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अन्य कर्मचाऱ्याला उशिरा देण्यात आलेल्या उपदानावरील व्याजाची रक्कम माझ्या पगारातून वसूल केली. ती परत मिळावी, अशी मागणी दोन वर्षांपासून मी करीत आहे. परंतु त्याबाबत उत्तर दिले जात  नाही, चौकशीही केली जात नाही व या योग्य माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.वसंत विश्वनाथ बोऱ्हाडे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.बोऱ्हाडे यांचा अर्ज पंचायत समितीकडे वर्ग करून विहित मुदतीत सर्व माहिती देण्यात आली आहे. तेरा तालुक्यांशी संबंधित अशा स्वरूपाची सन १९९६ ते १९९८ या काळातील माहिती अपीलकर्ता मागत असून तीही देण्यात आली. त्यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतचे उत्तरही देण्यात आले आहे. याच संदर्भातील अपीलकर्त्यांची अपील क्र.३८४/२००९/पुणे व अपील क्र.१३५४/२००९/पुणे ही अपिले आयोगाने पूर्वी फेटाळली आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.आनंद दा. पुसावळे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. पुनः पुन्हा त्याच कारणासाठी अर्ज/अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्ता श्री.वसंत विश्वनाथ बोऱ्हाडे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक रामचंद्र प्रभुणे
२५९, सोमवार पेठ, काळाराम मंदिर, नागेश्वर मंदिराशेजारी,
दारूवाला पुलाजवळ, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, भवन रचना विभाग,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, भवन रचना विभाग,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिपक रामचंद्र प्रभुणे
२५९, सोमवार पेठ, काळाराम मंदिर, नागेश्वर मंदिराशेजारी,
दारूवाला पुलाजवळ, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, भवन रचना विभाग, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्री.संदीप गोपाळ खांडवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पुणे महानगरपालिका स्थापन झाल्यापासून आजतागायत पॅनेलवर असलेल्या वास्तुविशारदांच्या संदर्भात मागितलेली माहिती अपुरी दिली.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असूनही गेल्या दहा वर्षांची माहिती तीस दिवसांत दिली. अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती असल्यामुळे अभिलेख अवलोकन करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले.

अपिलीय प्राधिकारी : संपूर्ण कर्मचारी वर्ग कामाला लावून आठ दिवसांत विस्तृत माहिती दिली. माहिती मिळाल्याची अपीलकर्त्यांची दि.१५.३.२०११ ची पोहोच आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी अतिव्याप्त स्वरूपाची आहे. नेमकी माहिती मागितलेली नसूनही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी ती देण्याचा प्रयत्न केला आहे, हे उल्लेखनीय आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र कावरे
७-अ, वृंदावन बंगला, अत्रेय सोसायटी,
गोखलेनगर रोड, शिवाजीनगर,पुणे-१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र कावरे
७-अ, वृंदावन बंगला, अत्रेय सोसायटी, गोखलेनगर रोड, शिवाजीनगर,पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे श्रीमती उल्का गणेश कळसकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपमुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्रीमती सविता सुनिल नलावडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पुणे महानगरपालिकेने महिलांच्या व पुरूषांच्या स्वच्छतागृहांसाठी केलेल्या तरतूदीबाबतची आकडेवारी व नेमकी माहिती मिळाली नाही. अर्थसंकल्पावरून माहिती घेण्यास सांगितले. परंतु त्यावरून ही माहिती काढता येणार नाही. अर्थसंकल्पावरून पृथक्करण करून माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : वेगवेगळ्या खात्यांकडून तरतुदी केल्या जातात. अर्थसंकल्पातून माहिती शोधून संकलित करून घ्यावी लागेल. एकूण ४० खातेप्रमुखांकडील ही माहिती आहे.

विश्लेषण / वर्गवारी करून माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तथापि अपीलकर्त्यांनी केलेली विचारणा सार्वजनिक हिताच्या विषयाशी निगडित आहे. हे लक्षात घेता सर्व खातेप्रमुखांकडून एकत्रित करून ही माहिती दिली पाहिजे. सर्व खातेप्रमुखांना तसे कळवून १५ दिवसांत त्यांच्याकडील माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे व अपिलीय प्राधिकारी मुख्य लेखापाल, मुख्य लेखापाल कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी दि.५.७.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अन्वरपाशा चाँदपाशा पटेल
मु.कुरघोट, पो.टाकळी, ता.उत्तर सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी, उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी, उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६३ / २००९ /सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अन्वरपाशा चाँदपाशा पटेल
मु.कुरघोट, पो.टाकळी, ता.उत्तर सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद श्री.किशोर भगवानराव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद श्री.विजयकुमार ग्यानोबा पडिले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जानेवारी २००५ते जुलै २००९ या कालावधीत लोहारा उपविभागातून मंजुरीसाठी पाठविलेल्या प्रस्तावाबाबतची माहिती विलंबाने, अपुरी व असमाधानकारक मिळाली.

जन माहिती अधिकारी : सन २००६ मध्ये हा नवीन उपविभाग सुरू झाला. अपीलकर्त्यांच्या दि.२.८.२००९ च्या अर्जानुसार प्रतिनिधी पाठवून दि.९.९.२००९ च्या पत्रान्वये माहिती पोहोच केली.

अपीलकर्ता यानी विस्तृत माहिती मागितली असून अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी करावी व जन माहिती अधिकारी यानी या प्रती अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवाव्यात. माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद यानी आयोगाला आठ दिवसांत सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्ता अभिलेख अवलोकनासाठी न आल्यामुळे दि.३१.३.२०११ च्या पत्रान्वये त्याना कळविले होते. परंतु अद्यापही ते आलेले नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद श्री.विजयकुमार ग्यानोबा पडिले यानी दि.३१.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यांचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार विहित मुदतीत अहवाल सादर न करण्याबाबतच्या खुलाशासह अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपविभाग लोहारा, ता.लोहारा, जि.उस्मानाबाद श्री.किशोर भगवानराव पाटील यानी आयोगाला दि.५.७.२०११ पर्यंत सादर करावा. यानुसार कार्यवाही न झाल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव नारायण काटे
उजनी जलविद्युत विभाग, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भिमा कालवा मंडळ, सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर, जि. सोलापूर श्री. रविंद्र प्रभाकर लांडेकर<br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर, जि. सोलापूर धनंजय मारुती गोडसे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

केवळ त्रास देण्यासाठी अपीलकर्ता श्री. बाबुराव नारायण काटे पुन:पुन्हा एकाच स्वरुपाच्या मागणीसाठी अर्ज व अपिले करीत असतात. प्रस्तुत अपिलातील मागणीच त्यानी अपील क्र. ११८+२२८/२००७/सोलापूर व अपील क्र. ९२७/सोलापूर या अपिलांमध्ये केली असून आयोगाने

त्यावर पूर्वी निर्णय दिला आहे. उपलब्ध असलेली कागदपत्रे त्याना वेळोवेळी देण्यात आली असून न झालेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी ते करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर, जि. सोलापूर श्री. धनंजय मारुती गोडसे व अपिलीय प्राधिकारी अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर, जि. सोलापूर श्री. रविंद्र प्रभाकर लांडेकर यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. त्याच त्याच मागणीसाठी पुनःपुन्हा अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्तास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश राधाकृष्ण फोंडगे
५४ ब, हनुमान नगर, पुणे ४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुकत (प्रशासन),
पोलिस आयुक्त कार्यालय, कॅम्प, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,
पिंपरी विभाग, पिंपरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २११०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |
| **३. उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त,<br>पिंपरी विभाग, पिंपरी श्री. सुधीर रामचंद्र चौगुले | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. रमेश राधाकृष्ण फोंडगे यानी गुंड व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींची माहिती मागितली होती. नावे नमूद करुन माहिती मागण्याबाबत त्याना कळविले. त्यानुसार त्यानी केलेल्या अर्जानंतर पोलिसांकडे उपलब्ध असलेली माहिती निःशुल्क देण्यात आली, असे प्रतिपादन

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी श्री. सुधीर रामचंद्र चौगुले यानी अपीलकर्त्यांच्या पत्नीच्या पोहचदर्शक स्वाक्षरी असलेल्या प्रतिसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश मांगले
व्दारा दैनिक पुढारी, मित्रमंडळ चौक, पुणे ४११ ००९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पुणे यांचे कार्यालय, पुणे ४११ ००८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरीक्षक,
वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रकाश मांगले
व्दारा दैनिक पुढारी, मित्रमंडळ चौक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलिस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री. रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस निरीक्षक,
वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. दशरथ शिवाजी पाटील

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - खोटे चेक देऊन फसवणूक केल्याबद्दल जाहिरातदाराविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती दि. ३.६.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. ३.६.२०१० च्या अर्जाला दि. २२.६.२०१० च्या पत्रान्वये उत्तर पाठविले व माहिती घेऊन जाण्यास कळविले. ते आले नाही. तसेच त्यानी प्रथम अपीलही जन माहिती अधिकाऱ्यांकडेच केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा पोलिस निरीक्षक, वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. दशरथ शिवाजी पाटील यानी माहितीबाबत विहित मुदतीत कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जयराम तुळशीराम भुजबळ
'आरंभ' बंगला क्र. १६३/१, स.नं. ३९, अपीलकर्ता
शिंदेवस्ती, केशवनगर, मुंढवा, पुणे ४११ ०३६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती हवेली, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे ४११ ००१
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत केशवनगर, मुंढवा, ता. हवेली, जि. पुणे ४११ ०३६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती हवेली, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे श्री. भगवंता तायाजी पवार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत केशवनगर, मुंढवा, ता. हवेली, जि. पुणे श्री. प्रदिप महादेव लोणकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जयराम तुळशीराम भुजबळ यानी ग्रामपंचायतीकडील विविध स्वरुपाची माहिती मागणारे तीन अर्ज केले होते. त्यानी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून अनेक मुद्दयांचे स्पष्टीकरण व पुरावे यांची मागणी केली आहे. कळविलेले शुल्क न भरता त्यानी अपील केले. नेमक्या माहितीची मागणी करण्यास त्याना सांगितले असता तसे न करता अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे तोंडी मुद्दे मांडले. त्याची दखल घेऊन शुल्क कळविले. ते ही त्यानी भरले नाही. ग्रामपंचायतीला त्रास देण्याच्या उद्देशानेच ते अशा प्रकारे अर्ज व अपिले करीत असतात, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत केशवनगर, मुंढवा, ता. हवेली, जि. पुणे श्री. प्रदिप महादेव लोणकर यानी केले. श्री.भुजबळ यांचे अर्ज व त्यावरील कार्यवाही याचा तपशील त्यानी सादर केला.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत केशवनगर, मुंढवा, ता. हवेली, जि. पुणे श्री. प्रदिप महादेव लोणकर व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती हवेली, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री. भगवंता तायाजी पवार यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांनी पुरावे, स्पष्टीकरण व विशिष्ट बाबी सिध्द करण्याची मागणी अशा स्वरुपाची विचारणा केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. उक्त अधिनियमाच्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या माहिती च्या संज्ञेत येणारी माहितीच देय ठरेल. त्यानुसारच मागणी करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि.१५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अमोल पोपट शिर्के
मु. पो. पिंपळी लिमटेक, ता. बारामती, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४२७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. अमोल पोपट शिर्के<br>मु. पो. पिंपळी लिमटेक, ता. बारामती, जि. पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा,<br>जि. सोलापूर श्री. मोहन सखाराम शिर्के | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले : अपीलकर्ता - सन १९३५ मधील फेरफाराची प्रत व जानेवारी १९७० ते डिसेंबर १९७५ या

काळातील मौजे जिंती ता. करमाळा, जि. सोलापूर मधील सर्व जमीन खातेदारांची सर्व माहिती मागितली होती. माहिती अपूर्ण मिळाली. धरणात गेलेली जमीन ७/१२ उताऱ्यावर दाखविलेली नाही. शुल्क जादा सांगितले व माहिती मागितल्यास जीवे मारण्याची धमकी तलाठी व अन्य कर्मचारी यानी दिली. त्यांच्यावर कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी- फेरफाराबाबत अपीलकर्ता यानी नेमका तपशील दिला नव्हता. तसे त्याना त्वरित कळविले. अन्य माहिती विस्तृत असल्यामुळे अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिली. प्रकल्पग्रस्त दाखला काढण्यासाठी त्याना माहिती हवी होती. परंतु त्यांच्या आजोबांचे नाव संबंधित कागदपत्रात आढळून न आल्यामुळे त्यानी माहिती घेण्यास नकार दिला. तसा पंचनामा त्यावेळी केला आहे. पाच वर्षातील खातेदारांची यादी त्याना टपालाने पाठविली. धमकी बाबतचे त्यांचे निवेदन खोटे आहे.

याच आशयाचे तपशीलवार लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. मोहन सखाराम शिर्के यानी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. मोहन सखाराम शिर्के व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर श्री. शांताराम सा. सांगडे यांनी माहिती बाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. जीवे मारण्याची धमकी दिली गेली असल्यास अपीलकर्त्यांनी पोलिसांकडे फिर्याद नोंदविणे योग्य ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिगंबर वामन गोरडे
संतकृपा हौसिंग सोसायटी, म्हेत्रेवस्ती (चिखली), ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे,
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांचे कार्यालय, पुणे-४११००८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
देहूरोड विभाग, देहूरोड, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६४.२.०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिगंबर वामन गोरडे
संतकृपा हौसिंग सोसायटी, म्हेत्रेवस्ती (चिखली), ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.रामनाथ पोकळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रार अर्जावर १५ दिवस होऊनही कार्यवाही झ ाली नाही. पोलिसांनी नंतर घेतलेल्या जबाबांच्या नकला व कारवाई का झाली नाही याची माहिती मिळाली नाही.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांच्या दि.६.५.२०१० च्या अर्जानुसार दि.२९.५.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती दिली. त्यामुळे प्रथम अपील अमान्य केले आहे. जबाबाच्या नकला मूळ अर्जात मागितलेल्या नव्हत्या. तरीही सर्व माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास विद्याधर वाडेकर
ब-२, शामकृपा सोसायटी, शिवाजीनगर, एस.टी.स्टँडमागे, पुणे-४११००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (भूमापन), महाराष्ट्र राज्य, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, आस्था-३,
जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३४+२५३५ /२०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विकास विद्याधर वाडेकर
ब-२, शामकृपा सोसायटी, शिवाजीनगर, एस.टी.स्टँडमागे, पुणे-४११००५

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालय अधीक्षक, आस्था-३, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.लालसिंग बाजीराव मिसळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : देय असलेली वेतनवाढ अकारण अडवून ठेवण्यात आली व मला जुन्नर येथे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले. नंतर देय वेतनवाढ देऊन फरकाचे बिल काढण्यात आले. परंतु मला न कळविता रकमा परस्पर खर्ची टाकल्या. याबाबत जबाबदार असणारे कर्मचारी व अधिकारी यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर मिळाली नाही. वेतनाचा दाखला मागितला असता पाठविल्यासारखे दाखविले, परंतु मला मिळाला नाही. याबाबत संबंधित कर्मचाऱ्यावर सक्त ताकीद देण्यासारखी जुजबी कारवाई केली.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यास सर्व माहिती दिली. संबंधित प्रकरणी अधिकाऱ्यावर कारवाई केलेली नाही, असेही स्पष्ट केले. अपील क्र.२५३५/२०१०/पुणे मध्ये माहिती मिळाल्याचे त्यानी लेखी दिले आहे.

अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. अभिलेखानुसार माहिती हवी असल्यास अपीलकर्ता यानी नेमकेपणाने तसा अर्ज जन माहिती अधिकारी याना द्यावा व त्यानी अर्ज दिल्यापासून १५ दिवसांत जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, आस्था-३, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.लालसिंग बाजीराव मिसळ यानी देय माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संपत माधवराव त्रिभुवन
भिमार्थ, इंगळेनगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजेनाका, पुणे-४११०५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या र.शिंदे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एका शाळेतील शिपायाच्या नेमणुकीसंदर्भातील तक्रार अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.संपत माधवराव त्रिभुवन यानी मागितली होती. संबंधित प्रकरणी चौकशी चालू

असल्याचे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी कळविले. चौकशी अजून पूर्ण झालेली नाही. ती आठ दिवसांत पूर्ण करून अहवाल मागविण्यात येईल व अपीलकर्त्यास त्याची माहिती दिली जाईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या र.शिंदे यानी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव म.पाटील
३०९, सोमवार पेठ(जोशी वाडा), सुंदरनगरी शेजारी, पुणे-४११०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव म.पाटील
३०९, सोमवार पेठ(जोशी वाडा), सुंदरनगरी शेजारी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी रंभाजी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षण प्रमुख, शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका, कै.भाऊसाहेब शिरोळेभवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे श्री.धनंजय परदेशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझ्या मुलीला अनुकंपा तत्त्वावर कामावर घेण्याची मागणी केली होती. ती मान्य केली गेली नाही. त्या अनुषंगाने मागितलेली माहिती विलंबाने व अपुरी मिळाली.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यानी सन २००० पासूनची माहिती मागितली होती. संबंधित कर्मचाऱ्यांना ती संकलित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यांच्याकडून ती विलंबाने प्राप्त झ ाली. त्यानंतर माहिती नि:शुल्क दिली.

अपिलीय प्राधिकारी : माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपील याबाबत योग्य कार्यवाही न केल्यामुळे सौ.निर्मला देशमुख, कार्यालय अधीक्षक व श्रीमती प्रभा पाध्ये, वरिष्ठ लेखनिक यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे. मात्र अपीलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही लक्षात घेता संबंधितांवर आणखी कारवाई करण्याची आवश्यकता नाही. तसेच अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय वैजीनाथ राऊत
७८/६१३, महर्षीनगर, पुणे-४११०३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
३९, डॉ.आंबेडकर रोड, संगम पुलाजवळ, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
३९, डॉ.आंबेडकर रोड, संगम पुलाजवळ, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय वैजीनाथ राऊत
७८/६१३, महर्षीनगर, पुणे-४११०३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, ३९, डॉ.आंबेडकर रोड,
संगम पुलाजवळ, पुणे-श्री.लक्ष्मण आनंदराव दराडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, ३९, डॉ.आंबेडकर रोड,
संगम पुलाजवळ, पुणे श्री.गजानन मधुकर नेरपगार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - दोनचाकी व चारचाकी वाहनांची नोंदणी व हस्तांतर यासाठी नोटरीसमोर केलेले प्रतिज्ञापत्र चालते का? नसल्यास, का नाही, याचा खुलासा, अशी मागणी केली होती. संकेतस्थळावरील नियमावलीत 'नोटरीसमोरील प्रतिज्ञापत्र स्वीकारले जाईल,' असे म्हटले असताना ते का नाकारले जाते?

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु माहितीच्या परिपत्रकाची प्रत त्यानी स्वीकारली नाही. चुकीच्या पध्दतीने गाड्यांची नोंद झाल्यामुळे काही काळासाठी नोटरीसमोरील प्रतिज्ञापत्र स्वीकारणे बंद केले होते. आता ते स्वीकारण्यात येत आहे, असे अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नंदकिशोर विठ्ठल थोरात
देवी लिंक हौसिंग सोसायटी, ई-८, लिंक रोड, चिंचवड, पुणे-३३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे सौ.प्रणिता चारूदत्त दाभोळकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे श्री.अरूण तानाजी माळी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.०२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.६.४.२०११ रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.नंदकिशोर विठ्ठल थोरात यानी दि.३.७.२००८ च्या अर्जान्वये १७ मुद्दयांची माहिती मागितली होती. त्यासाठी रूपये १०,८९०/- शुल्क दि.२८.७.२००८ च्या पत्रान्वये कळविले. त्यानी पैसे भरले नाहीत. म्हणून ज्या मुद्दयांसाठी शुल्क आकारणीची गरज नाही, अशी काही माहिती दि.२.८.२००८च्या पत्रान्वये दिली. त्यावर दि.५.८.२००८ रोजी अर्ज करून त्यानी आणखी काही माहिती मागितली. दिलेल्या माहितीव्यतिरिक्तची माहिती शुल्क भरून घेण्यास सांगितले असता, अपीलकर्ता यानी रूपये २०००/- दि.६.८.२००८ रोजी भरले व त्यात येईल तेवढी माहिती देण्याचे मान्य केले. तशी छाननी करून निवडक माहिती संकलित करणे आवश्यक होते, तशी दि.२.८.२००८ रोजी देण्यात आली. विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार, माहितीची पडताळणी करून संकलन करणे आदि बाबींमुळे एक दिवस विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अप्पर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे श्री.अरूण तानाजी माळी व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, मुंबई-पुणे रस्ता, बंगला नं.५, पुणे सौ.प्रणिता चारूदत्त दाभोळकर यानी पूरक कागदपत्रांसह केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लुईस बेंजामीन मद्रे
२६४, जनवाडी, पुणे-४११०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त
विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त
विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६१८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.लुईस बेंजामीन मद्रे<br>२६४, जनवाडी, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण),<br>उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे<br>विद्यमान-चंद्रकांत गणेश गायकवाड तत्कालीन-श्रीमती मीरा श्रीनिवास सबनीस | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पूरग्रस्त वसाहतीत इतरांना दिलेल्या जागावर मोठ्या इमारती बांधल्या गेल्या आहेत. परंतु माझे एकट्याचेच घर जमीनदोस्त करण्यात आले आहे. हा भ्रष्टाचार व अन्याय असून मला राहण्यासाठी मंजूरी/घर बांधण्यास परवानगी देण्याचे आदेश द्यावेत. अन्य रहिवाशांनी केलेल्या विनापरवाना बांधकामावर केलेल्या कारवाईबाबतची अथवा दिलेल्या परवानगीची माहिती द्यावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांची घराबाबतची मागणी माहितीच्या अधिकारात येणारी नाही. अन्य माहितीसाठी त्यांचा अर्ज संबंधित विभागाकडे त्वरित पाठविला होता.

संबंधित विभागाकडून माहिती प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यानी एका आठवड्यात अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास पुरविण्यात आल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम नियंत्रण), उपआयुक्त विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्रीमती मीरा श्रीनिवास सबनीस यानी दि.१८.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मोहनलाल काशिनाथ गुजराथी
मु.पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे ४१०५०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड,
ता.खेड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे ४१०५०५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६१६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मोहनलाल काशिनाथ गुजराथी
मु.पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे ४१०५०५

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, खेड,
ता.खेड, जि.पुणे श्री.गौतम दामाजी आझादे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत
राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे श्री.सुकदेव संपत साळुंके

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : खरेदीखताची नोंद करून घराचा उतारा देण्याची तसेच ग्रामपंचायतीच्या सन १९७४ व १९७९ मधील ठरावांबाबतची माहिती मागितली होती. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांचे दोन स्वतंत्र अर्ज होते. उपलब्ध माहिती विहित मुदतीत दिली. सन १९७४ व सन १९७९-८० चे ग्रामपंचायत मिळकत रजिस्टर शोध घेऊनही मिळाले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यांशी चर्चा करून सन १९७६-७७ चे फेरआकारणी मिळकतीचे उतारे दिले व ते त्यानी मान्य केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किसन सिताराम भोसले
द्वारा-आर.डी.कुलकर्णी आय सेंटर, गांजवे चौक, शास्त्री रोड,
नामजोशी भवन, पुणे-४११०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस,
तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस,
तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव विठ्ठलराव नावडकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती मीना तुकाराम निंबाळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.किसन सिताराम भोसले यानी जमीन प्रकरणातील माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज केला होता. अर्ज आपल्याला मिळाला नाही. प्रथम अपिलानंतर त्याबाबतची कल्पना आली. त्यानुसार उपलब्ध माहिती दिली. ऊर्वरित माहिती सन १९६५ मधील होती. ती संचिका शोधून प्राप्त झाल्यानंतर १२५ पृष्ठांच्या प्रती अपीलकर्त्यास नि:शुल्क पाठविण्यात आल्या, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी निवासी तथा नायब तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती मीना तुकाराम निंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, तहसील कार्यालय, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव विठ्ठलराव नावडकर यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रिजवान बाबुलाल शेख
६, वजीरनगर, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१) अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी
**(२) अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त(म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रिजवान बाबुलाल शेख
६, वजीरनगर, विजापूर रोड, सोलापूर

**(१) अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर श्री.एम.एस.वेळळे

| | |
|---|---|
| **(२) अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त(म),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अ.स.विपत<br><br>**(१)जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,<br>उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर<br>विद्यमान-श्री.एस.एस.खरबस, तत्कालीन - श्री.एस.डी.स्वामी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मिळकतीला असलेल्या नावात मार्च १९९० नंतर ज्या कागदपत्रांच्या आधारे बदल झाला त्यांच्या प्रती व संबंधित माहिती मिळाली नाही.

गटविकास अधिकारी, उत्तर सोलापूर : सन १९९२ मध्ये संबंधित गाव (विभाग) महानगरपालिकेकडे वर्ग झाला. त्यावेळी संबंधित दप्तर कर्मचाऱ्यांसह महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते.

अपिलीय प्राधिकारी : नमुना नं.८ ला (असेसमेंट) तशी नोंद आहे. परंतु संबंधित मिळकतीबाबतचे अभिलेख महानगरपालिकेच्या दप्तरी आढळत नाहीत.

उपलब्ध अभिलेखांचे अपीलकर्त्यास निःशुल्क अवलोकन करू द्यावे व महानगरपालिकेच्या अभिलेखात अधिक सखोल शोध घेऊन अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी दि.१८.५.२०११ च्या पत्रान्वये बोलाविण्यात आल्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, शहर हद्दवाढ कार्यालय, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.एम.एस.फुले यानी आयोगास अवगत केले. आयोगाच्या मौखिक आदेशानंतर त्वरित कार्यवाही होणे आवश्यक असल्याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर श्री.एस.डी.स्वामी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नवनाथ दगू बोचरे
मु.पो.देवगांव, ता.निफाड, जि.नाशिक अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७८ / २०१० २ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नवनाथ दगू बोचरे
मु.पो.देवगांव, ता.निफाड, जि.नाशिक

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग,
महाराष्ट्र राज्य, पुणे-श्री.सुरेश बळवंत खंडाळे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग,

| | |
|---|---|
| | महाराष्ट्र राज्य, पुणे-श्री.दिपक श्रीकृष्ण कापसे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.नवनाथ दगू बोचरे यानी सहाय्यक आवेदक कै.दगू पर्वत बोचरे यांच्या संदर्भातील सन १९८३ मधील बडतर्फी आदेशाची प्रत आदि माहिती मागितली होती. परंतु सन १९७९ ते १९८८ मधील मुदतबाह्य संचिका ‘ड’ वर्गीकरणात दि.८.१२.१९९२ रोजी नष्ट करण्यात आल्या असून त्याबाबतच्या नोंदीच्या प्रतीही अपीलकर्त्यास दिल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.दिपक श्रीकृष्ण कापसे व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, भूजल भवन, स.नं.५३अे/१/४,कृषी महाविद्यालय परिसर, वाकडेवाडी मार्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.सुरेश बळवंत खंडाळे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीकृष्ण भास्कर भागवत
११२९, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, पुणे-४११०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१,
पुणे यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीकृष्ण भास्कर भागवत
११२९, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, पुणे-४११०१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे- श्री.बा.वा.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१, पुणे यांचे कार्यालय, पुणे
श्री.सुनिल सो. इंदलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : माहितीच्या अधिकारात घेतलेल्या माहितीवरून सन १९९५ मधील एका दस्ताबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविले. परंतु हवा असलेला दस्तऐवज नसल्यामुळे, माहिती न घेता अभिलेखांचे अवलोकन केले. डिमार्केशन मॅप संचिकेतील तारखा व इतर तपशिलात तफावत आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्त्यांच्या दि.१४.५.२०१० च्या अर्जानुसार माहितीसाठी दि.१०.६.२०१० च्या पत्रान्वये शुल्क कळविले. संबंधित संचिकेमध्ये त्रुटी असल्याचे सांगून त्यानी माहिती स्वीकारली नाही. संपूर्ण संचिकेचे त्यानी अवलोकन केले आहे.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> : जन माहिती अधिकाऱ्यानी कळविल्यानुसार शुल्क भरून कागदपत्रे स्वीकारून माहितीबाबतची तक्रार असल्यास अपीलकर्त्यानी करावयास हवी होती. तसे न करता ते अन्य मुद्दे उपस्थित करीत आहेत. तसेच मूळ कागदपत्रांमध्ये त्रुटी व तफावत असल्यास तो माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. शिवाय माहितीच्या अधिकारात एकाच कागदपत्रांच्या एकाहून जास्त प्रती मागता येणार नाहीत.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचे निवेदन रास्त आहे. अनेक प्रतींची मागणी, मूळ कागदपत्रांमधील त्रुटींबाबतची तक्रार या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर शं.साळुंखे
महालक्ष्मी अपार्टमेंट, प्लॅट नं.२, पहिला मजला, जरगनगर
जकात नाक्याजवळ, पाचगाव, ता.करवीर, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८८ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.पुंडलिक शामराव चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,
मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.सुमंत रामचंद्र साळुंखे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.प्रभाकर शं.साळुंखे यानी दि.२९.१०.२००९ च्या पत्राप्रमाणे अनेक विषयांशी संबंधित अशा अनेक मुद्दयांबाबत विचारणा केली होती. तो माहितीच्या अधिकारातील अर्ज नव्हता व चर्चेसाठी बोलाविल्यास येण्याची तयारी आहे, असे त्यात नमूद केले होते. दि.१५.१.२०१० रोजी त्यानी अर्ज केला.त्याना प्रत्यक्ष बोलावून अभिलेख दाखविले. त्यांच्या मागणीनुसार माहिती दिली. समाधान झ ाल्याचे त्यावेळी त्यानी सांगितले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.सुमंत रामचंद्र साळुंखे यानी केले. तशाच आशयाचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, मुख्य कार्यालय, ताराबाई पार्क, कोल्हापूर श्री.पुंडलिक शामराव चव्हाण यानी दिलेल्या माहितीच्या प्रतींसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीपदादा शिवाजीराजे जगताप
कोडित नाका सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय,
पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड ता.पुरंदर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय,
पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय, पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड ता.पुरंदर, जि.पुणे श्री.मंगेश शामराव वैद्य<br>**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय, पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.सूर्यकांत विश्वनाथ महाजन | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने बिलाच्या वाटपांचे काम दिलेली संस्था समाधानकारक काम करीत नाही, नियमाबाह्यरीत्या हे काम देण्यात आलेले आहे. त्याबाबत आठ मुद्दयांची विचारणा केली असता, समाधानकारक खुलासा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेला नाही. एकाच एजन्सीची बिले भ्रष्टाचाराच्या उद्देशाने जाणीवपूर्वक उशिरा पाठविण्यात आलेली आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीपदादा शिवाजीराजे जगताप यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

अपीलकर्त्यांच्या दि.२७.६.२०१० च्या अर्जाला दि.२२.७.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देऊन माहिती दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान त्यानी आणखी माहिती मागितली, तीही दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय, पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.सूर्यकांत विश्वनाथ महाजन व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सासवड विभागीय कार्यालय, पारगांव चौक, पारगांव रोड, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.मंगेश शामराव वैद्य यानी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.मंदार प्र.शहाणे (अपील क्र.२२७३/२०१०/पुणे)
४३/४६/५०, कसबा पेठ, ओम केदारेश्वर सोसायटी, पुणे-११
(२)श्री.नंदकुमार बापूसाहेब नाईक (अपील क्र.२५६७ / २०१० / पुणे)
५३७, रास्ता पेठ, पुणे-४११०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पाणी पुरवठा कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७३+२५६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.मंदार प्र.शहाणे (अपील क्र.२२७३/२०१०/पुणे)
४३/४६/५०, कसबा पेठ, ओम केदारेश्वर सोसायटी, पुणे-११
(२)श्री.नंदकुमार बापूसाहेब नाईक (अपील क्र.२५६७ / २०१० / पुणे)
५३७, रास्ता पेठ, पुणे-४११०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, पाणी पुरवठा कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.विजय गो.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा कार्यालय,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.नंदकिशोर अ.जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मी महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागात कामाला असून माझ्या रजेच्या संदर्भात आमच्या घरमालकाने वैयक्तिक वादातून माहिती मागितली आहे. ती वैयक्तिक स्वरूपाची असल्यामुळे देऊ नये, असे जन माहिती अधिकाऱ्यांना मी कळविले. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ही माहिती त्रयस्थ पक्षाची नाही, असा अभिप्राय विधी सल्लागारानी दिला आहे. परंतु ही माहिती दिल्यास माझ्या जिविताला धोका असल्यामुळे दिली जाऊ नये.

मूळ अर्जदार : महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याच्या चार वर्षातील रजेची माहिती मागितली असून महानगरपालिका ही शासकीय संस्था असल्यामुळे माहिती व्यक्तिगत ठरत नाही. भाडेकरूशी असलेल्या वादाचा त्याच्याशी संबंध नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांची रजा व कामाची वेळ याबाबतची माहिती अन्य व्यक्तीने मागितली असून त्यांच्या आक्षेपामुळे ती देणे स्थगित ठेवले आहे.

सार्वजनिक / सरकारी सेवेतील कर्मचाऱ्याची रजा व कामाची वेळ ही बाब खाजगी/ गोपनीय असू शकत नाही. रजेचे कारण, आजाराचा तपशील, निवासी पत्ता अशा स्वरूपाच्या बाबी वैयक्तिक ठरू शकतात.त्यामुळे रजेच्या अर्जाची प्रत देऊ नये, मात्र रजेचे दिवस व कामाची वेळ हा तपशील द्यावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव काळुराम मोरे
रा. पारगांव, ता. दौंड, जि. पुणे                                        अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था दौंड, ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
पारगांव (सा.मा) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित.,
पारगांव, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सदाशिव काळुराम मोरे
रा. पारगांव, ता. दौंड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. बाळासाहेब मुरलीधर तावरे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
पारगांव (सा.मा) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित.,
पारगांव, ता. दौंड, जि. पुणे श्री. दत्तात्रय नारायण शिनोले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - माझ्या मालकीची जमीन असूनही कोणालाही साठेखत किंवा ताबा करुन दिलेला नसताना विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित., पारगांव (सा.मा), ता. दौंड, जि. पुणे या सोसायटीने पीक कर्ज नाकारले. त्याची कारणे व अन्य व्यक्तींच्या दाव्याप्रमाणे जमिनीचा ताबा असल्याबाबतचे पुरावे इ. माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- सन १९८९ मध्ये अपीलकर्त्यांनी खरेदीखत व ताबेपावती करुन दिलेली आहे. नमूद केलेल्या त्यांच्या जमिनीपैकी एक गट वादग्रस्त असून अन्य गटावर कर्ज वाटप करण्याची त्यांची मागणी आहे. बँकेकडील कर्जाची थकबाकी असल्यामुळे त्याना कर्ज दिलेले नाही. याबाबतची सर्व माहिती त्याना दिलेली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्याना माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. एकनाथ संपत गायकवाड
फ्लॅट नं. १०३, अजीता बिल्डिंग, अमृत कलश, अपीलकर्ता
शाहू कॉलनी, गल्ली नं. ९, कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पी.एम.टी.बिल्डिंग, जानकी हॉलचे पाठीमागे,
स्वारगेट, पुणे ४११ ०३७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पी.एम.टी.बिल्डिंग, जानकी हॉलचे पाठीमागे,
स्वारगेट, पुणे ४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. एकनाथ संपत गायकवाड
फ्लॅट नं. १०३, अजीता बिल्डिंग, अमृत कलश,
शाहू कॉलनी, गल्ली नं. ९, कर्वेनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पी.एम.टी.बिल्डिंग, जानकी हॉलचे पाठीमागे,
स्वारगेट, पुणे श्री. शंकरराव बापुराव भंडारे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,<br>पुणे विभाग, पी.एम.टी.बिल्डिंग, जानकी हॉलचे पाठीमागे,<br>स्वारगेट, पुणे श्री. भारत श्रीपती शिंदे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - महाविद्यालयांना प्रदान केलेल्या पुस्तकपेढी योजनेतील जादा रकमेच्या वसुलीच्या संदर्भात चलनांच्या प्रती व इतर माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्ता श्री. एकनाथ संपत गायकवाड यांच्याकडे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार असतानाच्या काळातील अतिप्रदानाचा हा विषय आहे. नऊ महाविद्यालयांना जादा रक्कम दिली गेली असून त्यातील सहा महाविद्यालयांकडून अद्याप वसुली व्हावयाची आहे. ३.४४ लाख रुपयांपैकी ६५ हजार रुपयांची वसुली बाकी असून १५ दिवसांत वसुली करुन त्या चलनांच्या प्रती देण्यात येतील. श्री. गायकवाड याना याबाबत यापूर्वीही कळविलेले आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून रकमेची/अतिप्रदानाची वसुली हा विषय सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या निर्णय कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण अमरित चौधरी
फ्लॅट नं. २, मंगलमूर्ती गार्डन, पौड रोड, — अपीलकर्ता
कोथरुड, पुणे ४११ ०३८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक विभाग, २ रा मजला, आदिवासी विकास भवन,
गडकरी चौक, नाशिक ४२२ ००२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
नाशिक विभाग, २ रा मजला, आदिवासी विकास भवन,
गडकरी चौक, नाशिक ४२२ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |
| **३. उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. नारायण अमरित चौधरी<br>फलॅट नं. २, मंगलमूर्ती गार्डन, पौड रोड,<br>कोथरुड, पुणे | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

एका व्यक्तीच्या संदर्भातील जात पडताळणीबाबतची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नारायण अमरित चौधरी यानी केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी आयोगाच्या पूर्व परवानगीने अनुपस्थित होते.

अपीलकर्ता यानी अन्य व्यक्तीच्या जात पडताळणी संदर्भातील माहिती मागितली असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही संदर्भ दिसून येत नाही. सबब अशा प्रकारची त्रयस्थ पक्षाची व्यक्तिगत माहिती देय ठरत नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज व अपिलांवर विहित मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग, नाशिक श्रीमती सु. अ. शेवाळे व अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक श्री. एम.के.मोरे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. देविदास नारायण आढे
वैष्णवी हौसिंग सोसायटी, आर.एम.४६,
संभाजीनगर, चिंचवड, पुणे ४११ ०१९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा चौधरी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पुणे जिल्हयातील सर्व घाऊक केरोसीन विक्रेत्यांच्या संदर्भातील सन २००६ ते २०१० या काळातील विस्तृत माहिती अपीलकर्ता श्री. देविदास नारायण आढे यानी मागितली होती. कार्यालयाकडील सर्व माहिती देण्यात आली असून काही माहिती संबधित विक्रेत्यांकडूनही मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचा ऊहापोह करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा चौधरी यानी केले.

अपीलकर्त्यांनी प्रशासकीय कार्यवाहीच्या पूर्ततेसह अनेक मुद्दयांची सरसकट स्वरुपात व विस्तृत माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा चौधरी व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. रविंद्र कुलकर्णी यांनी याबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुलाबराव सुखदेव कन्हेरकर
मु. भादलवाडी, पो. कळस, ता. इंदापूर, जि. पुणे ४११ ३१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, इंदापूर, मार्केट यार्ड, ता. इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
भाग्यनगर सहकारी सोसायटी,
मु. भादलवाडी, पो. कळस, ता. इंदापूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गुलाबराव सुखदेव कन्हेरकर
मु. भादलवाडी, पो. कळस, ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, इंदापूर, मार्केट यार्ड, ता. इंदापूर,
जि. पुणे श्री. मुकुंद भास्करराव पवार

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
भाग्यनगर सहकारी सोसायटी, मु. भादलवाडी, पो. कळस,
ता. इंदापूर, जि. पुणे, श्री. भाऊसाहेब पंढरीनाथ करे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - भाग्यनगर वि. का. से. सहकारी सोसायटी लि., भादलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे या संस्थेचा मी सभासद असून मागितलेली माहिती संस्थेने दिली नाही. माझे शेअर्स संस्थेने परत दिलेले नसल्यामुळे मी अद्याप सभासद असून माहिती मागण्याचा मला हक्क आहे.

जन माहिती अधिकारी- अपिलकर्ता संस्थेचे सभासद नाहीत. तसेच अन्य सभासदांच्या संदर्भातील आर्थिक विषयांची माहिती त्यानी मागितली असून ती देऊ नये, अशा पंच समितीच्या सूचना आहेत. मात्र आयोगापुढे माहिती सादर करीत आहे. संस्थेला शासनाचे कोणतेही अनुदान व अर्थसहाय्य मिळत नाही.

अपिलीय प्राधिकारी- उपरोक्त संस्थेला सरकारी अनुदान नाही. फार तर संस्थेच्या ताळेबंदाची प्रत आमच्या कार्यालयामार्फत देता येईल. शासकीय अर्थसहाय्य वा अनुदान नसल्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (एच) मधील तरतुदीनुसार उपरोक्त संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तिला लागू होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती जमिला मौलाबक्ष शेख
डब्ल्यु. बी.४/९, फ्लॅट नं. ००२, अजमेरा कॉम्प्लेक्स — अपीलकर्ता
मासुळकर कॉलनी, पिंपरी, पुणे - १८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पुणे शहर, पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (मुख्यालय-२)
पुणे शहर, पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्रीमती जमिला मौलाबक्ष शेख
डब्ल्यु. बी.४/९, फ्लॅट नं. ००२, अजमेरा कॉम्प्लेक्स,
मासुळकर कॉलनी, पिंपरी, पुणे - १८

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पुणे शहर, पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री. राजेश बनसोडे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (मुख्यालय-२)
पुणे शहर, पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री. ए.व्ही.गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - माझ्या वार्षिक गोपनीय अहवालाबाबत पोलिस आयुक्तांकडे मी सादर केलेल्या अभिवेदनावरुन प्रतिवेदन पुनर्विलोकन अधिकारी पोलिस उपायुक्त श्री. रविंद्र सेनगावकर यानी दिलेला अभिप्राय व त्याबाबतची पुराव्याची कागदपत्रे याच्या प्रती मागितल्या होत्या. त्या मिळाल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी- संबंधित कागदपत्रे गोपनीय असून श्री. सेनगावकर यांच्या शेऱ्यांची व अभिवेदनाची प्रत देता येणार नाही. पोलिस आयुक्तांनीही अपीलकर्त्यांची ही मागणी फेटाळली आहे.

अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांबाबत 'इंटीग्रिटी डाऊटफुल' असल्याचे म्हटलेले असून त्यामुळेच माहिती देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त (प्रशासन ), पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री. व्ही. एस. सोनवणे व अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उप आयुक्त (मुख्यालय-२), पुणे शहर, पोलिस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री. राजेश बनसोडे यांचा माहिती नाकारण्याचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामराव गणपत नवघन,
सर्व्हे नं. १७/४, मंगलनगर, वाकडरोड,
थेरगाव, चिंचवड, पुणे ४११ ०३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सर्कल,
तहसील कार्यालय, कळंब, जि. उस्मानाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार,
तलाठी कार्यालय, घारगाव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामराव गणपत नवघन,
सर्व्हे नं. १७/४, मंगलनगर, वाकडरोड,
थेरगाव, चिंचवड, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार,
तलाठी कार्यालय, घारगाव, ता. कळंब, जि. उस्मानाबाद
श्री. सचीन सुधीर एरंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मतदार यादी व शिधापत्रिका याबाबतची सन १९५६ ते २०१० या काळातील माहिती मागितली होती. दोन दोन ठिकाणी नावे असल्यामुळे बनावट मतदान होते. ते स्पष्ट होण्यासाठी माहिती हवी आहे.

जन माहिती अधिकारी- अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून ती संकलित करुन देणे शक्य नाही. तरीही जमेल तेवढा तपशील १५ दिवसांत देण्यात येईल.

अपीलकर्त्यांनी ५४ वर्षांच्या काळातील व सरसकट स्वरुपात माहिती मागितली आहे. मागणीत नेमकेपणा नाही. या स्थितीत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मल्लीक उर्फ काशीविश्वनाथ नामदेव लांडे
रा. रामचंद्र गेणुजी लोंडे (पाटील) बिल्डिंग, अपीलकर्ता
कासारवाडी, पुणे ४११ ०३४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मल्लीक उर्फ काशीविश्वनाथ नामदेव लांडे
रा. रामचंद्र गेणुजी लोंडे (पाटील) बिल्डिंग,
कासारवाडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. सुनिल ऐशीराम भागवानी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - न्यायालयात दावा दाखल असूनही संबंधित भूखंडावर अनधिकृत बांधकाम चालू असून त्याबाबत तक्रार केली होती. त्यावरील कार्यवाहीचा अहवाल मिळाला नाही. तसेच बांधकाम परवानगीचे नूतनीकरण करण्यात आलेले नसतांनाही महानगरपालिका कारवाई करीत नाही व संबंधित बांधकाम बेकायदेशीर असल्याची माहितीही देत नाहीत.

जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी - अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य तक्रारी ही दिवाणी न्यायालयीन बाब आहे.

अपीलकर्त्यांच्या तक्रारी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव काशीनाथ कोकणे
रा. सर्व्हे नं. ७१/१, किर्ती नगर,
नवी सांगवी, पुणे- २७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. महादेव काशीनाथ कोकणे
रा. सर्व्हे नं. ७१/१, किर्ती नगर, नवी सांगवी, पुणे- २७

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे
श्री. वसंत मारुती गाडेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - चॅप्टर केसबाबत मागणीनुसार कारवाई केली जात नाही व माहितीही दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी- सन २००९ मध्ये हे प्रकरण असून सर्व माहिती दिली आहे.

अपीलकर्त्याची कारवाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. त्याना माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रमोद विष्णु जगताप
व्दारा राजीव प्यारेलाल नंदा,
६९२, ताबूत स्ट्रीट, पुणे ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक,
हवेली क्र..१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
हवेली क्र..१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निबंधक,
हवेली क्र..१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ,
पुणे श्री. संजीव ना. देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
हवेली क्र..१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ,
पुणे श्री. प्रदीप दादाजी आहिरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रमोद विष्णु जगताप यांचा मूळ अर्ज व प्रथम अपील प्राप्त झालेले नाही. सन १९५० मधील अभिलेखांची त्यांची मागणी असल्याचे आयोगाकडील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते. अर्जाची प्रत त्यानी सादर केल्यास उपलब्ध अभिलेखांच्या प्रती देण्यात येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, हवेली क्र.्१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे श्री. प्रदीप दादाजी आहिरे व अपिलीय प्राधिकार तथा निबंधक, हवेली क्र.्१, खडकमाळ आळी, शुक्रवार पेठ, पुणे श्री. संजीव ना. देशमुख यांनी केले. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांना सादर करुन माहिती प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वासुदेव जमुनाप्रसाद शर्मा
ऑल इंडिया अँटीकरप्शन कमिटी, काळेवाडी फाटा, पिंपरी, पुणे १७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन,
ऋतुरंग संकुल, अरणेश्वर कॉर्नर, पुणे- सातारा रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वासुदेव जमुनाप्रसाद शर्मा
ऑल इंडिया अँटीकरप्शन कमिटी, काळेवाडी फाटा,
पिंपरी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल अग्रवाल

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
यांचे प्रतिनिधी श्री. विजयसिंह गवळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन,
ऋतुरंग संकुल, अरणेश्वर कॉर्नर, पुणे- सातारा रोड, पुणे श्री. प्रमोद का. जगताप

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्यांचे प्रतिनिधी - जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), पुणे- सातारा रोड, पुणे श्री. प्रमोद का. जगताप हे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे या खाजगी संस्थेत बसून त्यांच्याकडून पगार घेऊन काम करतात. ते शासकीय अधिकारी कशा प्रकारे झाले ? राजमुद्रा उमटविण्याचा अधिकार त्याना कोणी दिला ? इ. माहिती मागितली होती. त्यानी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांनी याच स्वरुपाचे ४/५ अर्ज केले आहेत. प्रस्तुत अपिलातील त्यांचा अर्ज प्राप्त झाला नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अपील नामंजूर केले. त्यांच्या अर्जातील मुद्दे संदिग्ध स्वरुपाचे आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीविषयी घेतलेले आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. जन माहिती अधिकाऱ्यांच्या वेतनाचा तपशील मात्र त्याना दिला पाहिजे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), पुणे- सातारा रोड, पुणे श्री. प्रमोद का. जगताप यानी दि. ७.४.२०११ च्या पत्रान्वये माहितीच्या प्रतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीरंग ठकूनाना आनोसे
मु. पो. कळवंतवाडी (आंबळे), ता. शिरुर
जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कळवंतवाडी, ता. शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. श्रीरंग ठकूनाना आनोसे
मु. पो. कळवंतवाडी (आंबळे), ता. शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे श्री. पी. डी. आव्हाड

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कळवंतवाडी, ता. शिरुर, जि. पुणे श्रीमती रुपाली सखाराम भागवत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ग्रामपंचायतीकडून १७ महिन्यांचा पगार मिळाला नसून तो मिळावा, या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्याच्या दि. ७.६.२०१० च्या अर्जाला दि. १६.६.२०१० रोजी उत्तर पाठविले. अभिलेख अवलोकनासाठी बोलावूनही ते आले नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार माहिती टपालाने पाठविली. अनेकदा माहिती देऊनही अपीलकर्ता पुनः पुन्हा अर्ज करतात. देऊ केलेली माहिती स्वीकारत नाहीत, अभिलेख अवलोकनासाठी येत नाहीत.

जन माहिती अधिकारी यानी आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ पूरक कागदपत्रे सादर केली.

अभिलेख अवलोकनासाठी न जाणे व देऊ केलेली माहिती न स्वीकारणे ही अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

'आता पूर्ण माहिती मिळाली असून काही तक्रार नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता यानी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र राघु निंबाळकर,
पौड रोड, केळेवाडी, सर्व्हे नं. ४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे ३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती (ग्रामपंचायत विभाग) पौड, ता. मुळशी, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बोतरवाडी, ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०८४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रामचंद्र राघु निंबाळकर,
पौड रोड, केळेवाडी, सर्व्हे नं. ४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे ३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी)
पंचायत समिती (ग्रामपंचायत विभाग) पौड,
ता. मुळशी, जि. पुणे श्रीमती रजनी माधव मांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बोतरवाडी, ता. मुळशी,

| | |
|---|---|
| | जि. पुणे श्री. शाहूराज बाजीराव गिरीगोसावी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता -जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नावाचे फलक लावले नसल्याबाबतची कारणमिमांसा मिळावी व फलक लावले असल्यास फोटोसह बिलाची प्रत मिळावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार योग्य माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलावर आदेश दिला नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- श्री. निंबाळकर यानी दि. २४.३.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहितीच दि. २१.४.२०१० च्या अर्जान्वये मागितली. सर्व माहिती दि. ८.४.२०१० रोजीच दिलेली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे फलक कार्यालयात लावलेले आहेत.

एकच माहिती पुन:पुन्हा मागण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. फलकाची छायाचित्रे काढून देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. मात्र संबंधित फलकांच्या बिलाची प्रत अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे**
**राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रकाश रामचंद्र रेडेकर
४६०, कवडेनगर, नवी सांगवी,
पुणे ४११ ०२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रकाश रामचंद्र रेडेकर
४६०, कवडेनगर, नवी सांगवी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर श्री. संजय गंगाधरराव पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - रीतसर खरेदी केलेली जमीन कब्जे वहिवाट असताना बोजा कमी होऊनसुध्दा ७/१२ उताऱ्यावर नोंद का केलेली नाही, याची माहिती तीन अर्जांद्वारे मागवूनही नेमकी दिली जात नाही.

<u>अपिलीय प्राधिकारी</u>- अपीलकर्त्यांनी वारंवार या स्वरुपाचे अर्ज केले असून ७/८ वेळा माहिती दिलेली आहे. ७/१२ उताऱ्यावर मालकी सदरी त्यांचे नाव दाखल करण्याबाबतचे अर्धन्यायिक प्रकरण अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यासमोर चालू आहे. तसेच चुकीचा ७/१२ दिल्याबद्दल तत्कालीन तलाठी श्री. कडूकर यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा केलेली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्याना प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**

**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती रुपाली दत्तात्रय भालेराव
व्दारा जैद एस. पी. गवारे इंजिनिअरिंग शेजारी,
मु. शिवाजीवाडी, पो. मोशी, ता. हवेली, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्रीमती रुपाली दत्तात्रय भालेराव
व्दारा जैद एस. पी. गवारे इंजिनिअरिंग शेजारी,
मु. शिवाजीवाडी, पो. मोशी, ता. हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,

| | |
|---|---|
| | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. महावीर माने<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपआयुक्त,<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,<br>१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे श्री. एस. एन. पांढरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - प्राथमिक शिक्षण सेवक भरतीपूर्व निवड परीक्षेतील उत्तरपत्रिकेच्या प्रती व अन्य माहिती मागितली होती. ती दिली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार प्रश्नपत्रिका व उत्तरसूची यांच्या प्रती देऊ केल्या होत्या. त्यानी शुल्क भरले नाही. तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रती न देण्याचा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा निर्णय असल्याचे कळविले. अन्य अपिलात अशा उत्तरपत्रिका देण्याबाबत आयोगाने दिलेल्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने उत्तरपत्रिकांच्या प्रतींच्या संदर्भात दिलेली स्थगिती लक्षात घेता प्रस्तुत अपिलात कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय खंडू खरात
व्दारा श्री. डी. व्ही.भांगरे, सर्व्हे नं. ३१/१, अपीलकर्ता
मिलिंद निवास, चौधरी नगर, धानोरी, पुणे ४११ ०१५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि. पुणे श्री. अशोक रामचंद्र जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय खंडू खरात यानी जमिनीच्या सत्ताप्रकाराच्या 'खालसा' या उल्लेखाबाबत मागितलेली माहिती यापूर्वीही देण्यात आली असून पुन्हा हवी असल्यास देण्याची तयारी असल्याचे विहित मुदतीत कळविले. अपिलीय प्राधिकारी यानी माहिती निःशुल्क देण्याचे आदेश प्रथम अपिलावर दिले. नियमानुसार शुल्क भरुन कागदपत्रांच्या प्रती घेण्याचे अपीलकर्त्यांनी मान्य केले होते. रजिस्टर्ड टपालाने त्याना त्याबाबत कळवूनही ते आले नाहीत. तीच तीच माहिती वेगवेगळया प्रकारे पुनः पुन्हा ते मागत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आंबेगाव (घोडेगाव), जि. पुणे श्री. अशोक रामचंद्र जाधव यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रशेखर गोपाळ जोशी
आळंदी देवाची, गोपाळ पूरा, ता. खेड,
जि. पुणे-४१२ १०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. चंद्रशेखर गोपाळ जोशी
आळंदी देवाची, गोपाळ पूरा, ता. खेड, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे श्री. प्रकाश संपतराव पाटील

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सन १९९२ ते १९९५ या काळातील पुण्याच्या अप्पर विभागीय आयुक्तांची नावे, निवासी पत्ते इ. माहिती मागीतली होती. ती अपूर्ण मिळाली.

जन माहिती अधिकारी- संबंधित कालावधीतील अधिकाऱ्यांची नावे व कालावधी अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविला. ते सध्या कोठे आहेत, त्यांचे निवासी पत्ते इ. माहिती आमच्या कार्यालयाकडे नसते. मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून अपीलकर्त्यांनी ही माहिती घ्यावी. तसेच निवासी पत्ता ही खाजगी बाब असल्यामुळे देता येणार नाही, असेही कळविले.

याच आशयाचे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे श्री. प्रकाश संपतराव पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त, पुणे विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे श्री. रामचंद्र नारायण जोशी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** — **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा

मजला,

कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भगवंतराव म्हस्कू म्हेत्रे
४९७ क, सोपाननगर सासवड, ता. पुरंदर,
जि. पुणे ४१२३०१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सरदार दस्तूर होरमाझदियार ज्युनियर कॉलेज,
कर्नल तारापोर रोड, कॅम्प, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. भगवंतराव म्हस्कू म्हेत्रे
४९७ क, सोपाननगर सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे श्री. सुनिल बाबुराव मगर

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,<br>सरदार दस्तूर होरमाझदियार ज्युनियर कॉलेज,<br>कर्नल तारापोर रोड, कॅम्प, पुणे श्रीमती सविता एस. कामठे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. भगवंतराव म्हस्कू म्हेत्रे यानी केली.

श्री. म्हेत्रे यानी माहिती मागितलेले कनिष्ठ महाविद्यालय कायम विनाअनुदानित आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे नमूद करुन माहिती दिली नाही, असे प्रतिपादन प्राचार्या श्रीमती सविता एस. कामठे यानी केले. मात्र माहितीची कागदपत्रे त्यानी आयोगापुढे सादर केली.

संबंधित महाविद्यालयास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे अपीलकर्त्यास कळवून प्रथम अपिलाची सुनावणी घेतली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे श्री. सुनिल बाबुराव मगर यानी केले.

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे श्री. सुनिल बाबुराव मगर यांचे निवेदन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. मलिका श्रीकांत कर्वे
८/९६७, सेनापती बापट रोड,
पुणे - ४११ ०१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सं.नं. ५८२/डी, गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे ४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. मलिका श्रीकांत कर्वे
८/९६७, सेनापती बापट रोड,
पुणे यांचे प्रतिनिधी श्री. श्रीकांत यशवंत कर्वे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे यांचे प्रतिनिधी श्री. विजय गवळी

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, सं.नं. ५८२/डी, गुलटेकडी,<br>मार्केटयार्ड, पुणे श्री. किरण अभिमन सोनवणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मीरा को. ऑप. हौसिंग सोसायटी नं.१ लि., अतुर संगतानी पार्क, पुणे या संस्थेच्या उपविधीची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी- मीरा को. ऑप. हौसिंग सोसायटी नं. १ लि., अतुर संगतानी पार्क, पुणे या संस्थेच्या आमच्या कार्यालयातील 'अ' धारिकेमध्ये संबंधित उपविधीची प्रत नव्हती. अपीलकर्त्यांना तसे विहित मुदतीत कळविले. उपविधीची प्रत पुनर्गठित करुन अपीलकर्त्यास देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार संस्थेच्या अध्यक्षांकडून मागविलेली उपविधीची प्रत दि. ५.४.२०११ रोजी प्राप्त झाली. त्याच दिवशी अपीलकर्त्यांना दूरध्वनीवरुन कळविले. आता प्रत देत आहोत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** **पुणे खंडपीठ, पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.के.व्ही.राजू
सी/२४, रेल रेसीडेन्सी, सीएचएस, रेल विहार, बिजलीनगर, चिंचवड, पुणे-३३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत
वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, पिंपरी, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, चिंचवड उपविभाग,चिंचवड, पुणे-४११०३३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.के.व्ही.राजू
सी/२४, रेल रेसीडेन्सी, सीएचएस, रेल विहार, बिजलीनगर, चिंचवड, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, पिंपरी, पुणे श्री.इब्राहिम अब्दुलकादर मुलाणी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पिंपरी विभाग, चिंचवड उपविभाग,चिंचवड, पुणे श्री.मुकुंद विश्वनाथ दुसाने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वीजचोरीच्या संदर्भातील माहिती पाच महिने होऊनही मिळाली नाही. आधीच्या अर्जावर दिलेल्या माहितीत तफावत आहे.

जन माहिती अधिकारी : अर्जाला मुद्देनिहाय उत्तर दिले. अभिलेखानुसार दिलेली माहिती योग्य आहे.

अपिलीय प्राधिकारी : माहिती मुदतीत दिली. परंतु अपीलकर्त्यांनी पाच महिन्यांनी पुन्हा अपील केले. माहितीत कोणतीही तफावत नाही. यापूर्वीही अपीलकर्त्यांनी याच संदर्भात अर्ज व अपिले केली आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीरंग रामचंद्र काळे
डी-२, स्नेह पॅराडाईज, रामबाग कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ २९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा भूमि संपादन विशेष अधिकारी,
विशेष घटक क्र. २, संत तुकारामनगर, मार्केट इमारत,
पिंपरी, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह. नगर रचनाकार,
भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र. २,
संत तुकारामनगर, मार्केट इमारत, पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. श्रीरंग रामचंद्र काळे
डी-२, स्नेह पॅराडाईज, रामबाग कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ २९

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा भूमि संपादन विशेष अधिकारी,<br>विशेष घटक क्र. २, संत तुकारामनगर, मार्केट इमारत,<br>पिंपरी, पुणे श्री. प्रभाकर गणपत नाळे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सह. नगर रचनाकार,<br>भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र. २,<br>संत तुकारामनगर, मार्केट इमारत, पिंपरी, पुणे श्री. सुभेदार राजाराम सूर्यवंशी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - रस्तारुंदीसाठी संपादित केलेल्या जमिनीच्या संदर्भात मागितलेली माहिती वर्ष होऊनही मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी- अपीलकर्त्यांच्या दि. ११.६.२०१० च्या अर्जानुसार दि.६.७.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. काही बाबींसंबंधी स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची विचारणा त्यानी अन्य निवेदनाद्वारे केली होती. अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन त्यांनी घ्याव्यात, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला. त्यानुसार कळविलेले शुल्क त्यांनी भरलेले नाही. त्यामुळे प्रती पुरविल्या नाहीत.

अपिलीय प्राधिकारी- कार्यालयाकडील धारिका पाहून कागदपत्रांची मागणी जन माहिती अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचे अपीलकर्त्यांनी लेखी दिले आहे. त्यानुसार पाहणी केल्यानंतर आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकाऱ्यांनी कळवूनही अपीलकर्त्यांनी भरले नाही. त्यानंतर त्यानी आणखी एक अर्ज केला. त्याबाबतही अपीलकर्त्यांनी अशाच प्रकारे शुल्क भरणा न करता अपील केले. शुल्क भरल्यास त्याना माहिती देता येईल.

जन माहिती अधिकारी यानी कळविल्याप्रमाणे व संबंधित प्रकरणातील अभिलेखांचे अवलोकन केल्यानंतर हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींचेही शुल्क न भरता अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. अपीलकर्त्यास हव्या असल्यास त्यांच्या लेखी मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारुन ८ दिवसांत जन माहिती अधिकारी तथा सह. नगर रचनाकार, भूमि संपादन विशेष अधिकारी, विशेष घटक क्र. २, संत तुकारामनगर, मार्केट इमारत, पिंपरी, पुणे श्री. सुभेदार राजाराम सूर्यवंशी यानी पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.नवनाथ रामदास देवकर
(२)श्री.नवनाथ दामोदर गारगोटे — अपीलकर्ता
(३)श्री.भिमराव जयसिंग लगड
(४)श्री.रामदास बबन जाधव
(५)श्री.संदिप गजानन भोईटे
(६)श्री.संगीता प्रभाकर पाटोळे
'शिवचैतन्य' सर्व्हे नं.५५/२, देवकर पथ, त्रिमूर्ती कॉलनी, नवी सांगवी,पुणे-४११००७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.नवनाथ रामदास देवकर
(२)श्री.नवनाथ दामोदर गारगोटे
(३)श्री.भिमराव जयसिंग लगड
(४)श्री.रामदास बबन जाधव
(५)श्री.संदिप गजानन भोईटे

| | |
|---|---|
| | (६)श्री.संगीता प्रभाकर पाटोळे<br>'शिवचैतन्य' सर्व्हे नं.५५/२, देवकर पथ, त्रिमूर्ती कॉलनी, नवी सांगवी,पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.विष्णू जाधव<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती शारदा लोंढे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझ्यासह सात शिक्षकांना कै.श्री.भाऊसाहेब तापकीर प्राथमिक विद्यामंदिर, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे या शाळेने सात महिन्यांचे वेतन दिलेले नाही. सेवापुस्तके भरलेली नाहीत, बेकायदेशीरपणे वेतनवाढी कमी करणे, रजा बिनपगारी करणे अशा स्वरूपाच्या अनेक नियमबाह्य बाबी असूनही तक्रारींची दखल शाळेने अथवा शिक्षण मंडळानेही घेतली नाही. त्या संदर्भातील माहितीही दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : खाजगी प्राथमिक शाळेशी निगडित असा हा विषय असून शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे माहिती त्यांच्याकडून घेण्याबाबत कळविले. संबंधित प्रकरणातील कार्यवाहीबाबतचा अहवाल आठ दिवसात देण्यात येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांची मागणी/तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. मात्र संबंधित सर्व अभिलेखांचे अवलोकन अपीलकर्त्यास करू द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.५.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीत नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.विष्णू जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्रीमती शारदा लोंढे यानी संबंधित प्रकरणातील कार्यवाहीबाबतचा अहवाल आठ दिवसांत सादर केलेला नाही, ही बाब गंभीर आहे. त्यांनी दि.५.७.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यांना पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. कैलास पांडुरंग खैरनार
ई ३/४०१, हरिगंगा, आर.टी.ओ. समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११ ००६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,
नगर रोड डिव्हिजन, पुणे ४११ ०१४.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,
नगर रोड डिव्हिजन, पुणे ४११ ०१४.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कैलास पांडुरंग खैरनार
ई ३/४०१, हरिगंगा, आर.टी.ओ. समोर,
आळंदी रोड, येरवडा, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,
नगर रोड डिव्हिजन, पुणे श्री. सुरेश लक्ष्मण गणेशकर

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी,<br>नगर रोड डिव्हिजन, पुणे श्री. बाळासाहेब भागवत हळनोर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वीज पुरवठा तोडण्याची धमकी वीज मंडळाच्या दोन कर्मचा-यांनी दिली. असे अधिकार त्याना कोणी दिले, या संदभातील नियमावलीची माहिती मागितली होती. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई का केली नाही, हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे. यासाठी आता ७ दिवसांची मुदत जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितली आहे. ते मान्य आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी- अपीलकर्त्यांनी कायदेशीर अन्वयार्थाच्या स्वरुपाचे अनेक मुद्दे उपस्थित केले असून विशिष्ट तक्त्यांमध्येही माहिती मागितली आहे. विहित मुदतीत त्याना उत्तर दिले होते. मात्र आता त्यांच्याशी चर्चा झाली असून माहिती व कसूरदार कर्मचाऱ्यांवरील कार्यवाही याबाबत पुढील ७ दिवसांत अहवाल सादर करण्यात येईल.

याच आशयाचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता कायदाविषयक अन्वयार्थाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. तसेच विशिष्ट नमुन्यात माहिती तयार करुन देणे व सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखी माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तथापि जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नगर रोड डिव्हिजन, पुणे श्री. बाळासाहेब भागवत हळनोर यानी दिलेल्या लेखी निवेदनानुसार ७ दिवसांत अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, नगर रोड डिव्हिजन, पुणे श्री. बाळासाहेब भागवत हळनोर यानी सादर केलेल्या लेखी निवेदनानुसार अहवाल विहित मुदतीत सादर न करण्याबाबतच्या खुलाशासह कार्यवाहीचा अहवाल दि. ५/७/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.कन्हैयालाल मो.तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,**
पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, ३रा मजला,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,**
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे शहर, ५ फायनान्स रोड,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,२रा मजला,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७५/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.कन्हैयालाल मो.तालेरा<br>१४, मोतीलाल तालेरा रोड,<br>पुणे-४११ ००१<br><br>**जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी,**<br>मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे शहर पुणे, ५ फायनान्स रोड,<br>शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत,२रा मजला, पुणे-४११ ००१<br>श्री.संजीव ना.देशमुख | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,**<br>पुणे विभाग, पुणे नवीन प्रशासकीय इमारत ३रा मजला, पुणे-४११ ००१<br>श्री.चिंतामणी जोशी |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.सूर्यकांत बडे व दत्तात्रय बडे यांच्या मुद्रांक शुल्क आकारणीबाबत |

**विवेचन**

माहिती-मागणी अर्जाप्रमाणे नकला मिळाल्या असल्याचे अपीलकर्ता श्री.कन्हैयालाल मो.तालेरा यानी सुनावणीच्या वेळी लेखी व तोंडी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.श्रीपाद मुरलीधरराव व्यास
२९४, फ्लॅट नं.६, 'यशगिरी '
प्रसादे बिल्डिंग, कसबा पेठ,
पुणे-४११ ०११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी व बांधकाम परवानगी विभाग प्रमुख,**
उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५६/२०११/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.श्रीपाद मुरलीधरराव व्यास<br>२९४, कसबा पेठ, फ्लॅट नं.६,<br>'यशगिरी ', प्रसादे बिल्डिंग, पुणे-४११ ०११<br><br>**जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी बांधकाम परवानगी विभाग प्रमुख,**<br>उस्मानाबाद नगरपरिषद,<br>उस्मानाबाद श्री.व्ही.जे.थिटे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,** | |

| | |
|---|---|
| | उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद<br>श्री.दिलीप गणपतराव देशमुख |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** घर क्र.२७/१३३०, समता नगर उस्मानाबाद या इमारतीच्या बांधकाम परवानगी व ताबा प्रमाणपत्राबाबत |

**<u>विवेचन</u>**

' जन माहिती अधिकारी तथा कर आकारणी बांधकाम परवानगी विभाग प्रमुख, उस्मानाबाद नगरपरिषद, उस्मानाबाद श्री.व्ही.जे.थिटे यांच्याकडून मला अभिप्रेत असणारी व मी मागणी केलेली सर्व माहिती मिळाली असल्याने माझी कोणतीही तक्रार राहिलेली नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.श्रीपाद मुरलीधरराव व्यास यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.दतात्रय रमाकांत सवाई
९९७/६, सत्संग सोसायटी, नवी पेठ, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**
पुणे शहर (१) पुणे स.नं.५८२/डी,गुलटेकडी,
मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.दतात्रय रमाकांत सवाई<br>९९७/६, टी, नवी पेठ,<br>पुणे-४११ ०३०<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,**<br>पुणे शहर (१) पुणे स.नं.५८२/डी,गुलटेकडी,<br>मार्केटयार्ड, पुणे ४११०३७<br>श्री.किरण अभिमन सोनवणे | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे कार्यालय व | |

| | सत्संग गृहनिर्माण संस्था, नवी पेठ, पुणे यांच्यातील पत्रव्यवहारांच्या प्रती |
|---|---|

**विवेचन**

'माझ्या द्वितीय अपिलावरील राज्य माहिती आयोगाने पाठविलेल्या सुनावणी नोटिशीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे यांच्या कार्यालयात दि.२१.६.२०११ रोजी उपस्थित राहून चर्चा केली असता, जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे यानी माझ्या 'सत्संग गृहनिर्माण संस्थे'संदर्भातील अर्जावर फेरसुनावणी घेण्याचे मान्य केले आहे. सदर खुलाशामुळे माझे समाधान झाल्याने माझे अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.दतात्रय रमाकांत सवाई यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे श्री.किरण अभिमन सोनवणे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले. मात्र अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सतीश नारायण राक्षे
मु.पो.साळुंब्रे, ता.मावळ, **अपीलकर्ता**
जि.पुणे-४१२ १०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसीलदार वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
तहसीलदार वडगांव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>श्री.सतीश नारायण राक्षे<br>मु. पो.साळुंब्रे, ता.मावळ,<br>जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**<br>तहसीलदार वडगांव मावळ, ता.मावळ, जि.पुणे<br>श्री.राजेश चव्हाण<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,** | |

| | |
|---|---|
| | तहसीलदार वडगांव मावळ, ता.मावळ, जि.पुणे<br>श्री.सचिन बारवकर |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे गहुंजे, ता.मावळ येथील गट क्र.१३९ च्या ७/१२ उताऱ्यावर सन २००८-०९ साली श्री.निर्गुण निवृत्ती बोडके यांचे नाव ज्या कागदपत्रांच्या आधारे लावण्यात आले त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जावर तहसील कार्यालय, मावळ यांच्याकडून मला उत्तर मिळाले असून आता माझी काहीही तक्रार नाही', असे निवेदन अपीलकर्ता श्री.सतीश नारायण राक्षे यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-२७ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सतिश नरसू मोरे
